**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन  डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ०५ | बुधवार,दि.११ जानेवारी २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर आत्ता व्हलेंटाईन डे रोजी होणार पुढील सुनावणी




**मुंबई–** महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षासाठी आज सकाळी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाल्यानंतर पुन्हा नवी तारीख मिळाली.त्यामुळे तारीख..पे तारीख असा हा सत्तासंघर्ष ठरला असून येत्या १४ फेब्रुवारी रोजी पुढील सुनावणी होणार आहे.
त्यानंतर आता निवडणूक आयोगाच्या कार्यालयात धनुष्यबाण हे चिन्ह कुणाचे? यावर युक्तिवाद सुरु आहे. ठाकरे आणि शिंदे गटाकडून कागदपत्रे दाखल केली आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने खासदार अनिल देसाई, संजय राऊत यावेळी उपस्थित आहेत. शिंदे गटाकडूनही युक्तिवादाची जोरदार तयारी केलेली असून चार मोठ्या बॅग भरून कागदपत्रे आयोगासमोर नेण्यात आले आहेत. ठाकरे गटाकडून जेष्ठ वकील कपिल सिब्बल हे युक्तिवाद करत आहेत. तर शिंदे गटाकडून ज्येष्ठ विधीज्ञ महेश जेठमलानी हे बाजू मांडत आहेत.

**ठाकरे गटाचा युक्तिवाद**
ठाकरे गटाची बाजू मांडणारे कबिल सिब्बल म्हणाले की, सुप्रीम कोर्टात निर्णय होईपर्यंत आयोगाने सुनावणी घेऊ नये. सुप्रीम कोर्टाने बंडखोरांना अपात्र ठरवले तर या आयोगाने दिलेला कोणताही निर्णय योग्य ठरणार नाही. तसेच शिंदे गटाने सादर केलेली कागदपत्रे अयोग्य असल्याचे सिब्बल म्हणाले.

**शिंदे गटाचा युक्तिवाद**
सर्वोच्च न्यायालयात आज कुणालाही अपात्र ठरविण्यात आलेले नाही. त्यामुळे शिवसेना व धनुष्यबाण कुणाचा हे ठरविण्यात काहीच अडथळा नाही, असा युक्तिवाद महेश जेठमलानी यांनी केला. तसेच त्यांनी शिवसेनेच्या घटनेचा हवाला देत म्हटले की, उद्धव ठाकरेंचे शिवसेना प्रमुखपदच बेकायदेशीर आहे. शिवसेनेची जुनी घटना शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे केंद्रित होती. पण नंतर ती न बदलता उद्धव ठाकरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख असे नाव स्वतःसाठी घेतले. पण त्यामुळे ते शिवसेनेचे प्रमुख होत नाहीत.
शिंदे गटाकडे सध्या १२ खासदार, ४० आमदार आहेत. संघटनात्मक प्रतिनिधींपैकी ७११, स्थानिक स्वराज संस्थेतील २०४६ प्रतिनिधी आणि चार लाखांच्या पुढे प्राथमिक सदस्य असल्याचे शिंदे गटाचे म्हणणे आहे. तर ठाकरे गटाकडून २२ लाख २४ हजार ९५० प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. तर शिंदे गटाकडूनही चार लाख ५१ हजार १२७ इतकी प्रतिज्ञापत्र गोळा करण्यात आली असून ती देखील आयोगासमोर सादर करण्यात आलेली आहेत. शिंदे गटाने दावा केला आहे की, आमच्याकडे निवडून आलेल्या प्रतिनिधींची संख्या जास्त आहे. त्यामुळे आम्ही निकषांची पुर्तता करत आहोत.
काही दिवसांपुर्वीच अंधेरी पूर्व विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेच्या शिंदे आणि ठाकरे गटासाठी वेगवेगळे चिन्ह आणि नावं जाहीर केली होती. पण ती नावं आणि चिन्ह तात्पुरत्या स्वरुपाची होती. आता दोन्ही गटाच्या मागण्या आणि दावे-प्रतिदावे या सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठी निवडणूक आयोगाची महत्त्वपूर्ण सुनावणी होत आहे.

## विद्यार्थी ११ महिन्यांपासून निर्वाह भत्त्याच्या प्रतीक्षेत

**नागपूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असतानाही या विभागाला निधीची चणचण भासत आहे. परिणामी, विभागाच्या वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना अकरा महिन्यांपासून निर्वाह भत्ता मिळालेला नाही. मुख्यमंत्र्याकडे
असलेल्या मंत्रालयाचीच अशी अवस्था असेल तर अन्यचे काय, असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने राज्यात मुला-मुलींची ४४५ वसतिगृहे चालवली जातात. ज्यामध्ये ५० हजारांवर विद्यार्थी शिक्षण घेतात. या विभागाकडून वसतिगृहांमध्ये दर्जेदार सुविधा पुरवण्याचा दावा केला जात असला तरी वास्तविकता मात्र वेगळी आहे. करोनाकाळामध्ये सामाजिक न्याय विभागाची सर्व वसतिगृहे बंद होती. या दरम्यान शाळा, महाविद्यालयेही बंद असली तरी ऑनलाइन शिक्षण सुरूहोते. परिणामी, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना बाहेर भाडयाची खोली घेऊन राहण्याशिवाय पर्याय नव्हता. मात्र, या काळात केवळ वसतिगृह बंद असल्याचा निकष लावून सामाजिक न्याय विभागाने या काळातील १९ महिन्यांचा निर्वाह भत्ता आणि शैक्षणिक साहित्याचा खर्च देण्यास नकार दिला.
आता वसतिगृह सुरू झाल्यानंतरही फेब्रुवारी ते डिसेंबर असा अकरा महिन्यांचा निर्वाह भत्ता शासनाकडे रखडला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण कशा कराव्या, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सध्या सामाजिक न्याय मंत्रालय मुख्यमंत्र्यांकडेच आहे. असे असतानाही या विभागाला कायम निधीची कमतरता भासत आहे.यासंदर्भात विचारणा करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या आयुक्तांना संपर्क साधला असता होऊ शकला नाही.
चौकट दोन वर्षांपासून शैक्षणिक साहित्य नाही वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षाला शैक्षणिक साहित्यासाठी खात्यात पैसे दिले जातात. मात्र शासनाने दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिलेले नाही. त्यामुळे शासनाने ही योजना बंद केली की काय, असा प्रश्न विचारला जात आहे.
निर्वाह भत्ता दिल्याची माहिती नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात मंत्र्यांनी दिली. परंतु फेब्रुवारी २०२२ पासून निर्वाह भत्ता मिळाला नाही. सामाजिक न्याय विभागामध्ये अनेक महत्त्वाची काम असतात. त्यामुळे या खात्याला स्वतंत्र मंत्री असायला हवा.
– खेमराज मेंढे,विद्याथी प्रतिनिधी

## घरकुल योजनेत महाराष्ट्र प्रथम

मुंबई, दि. १० : राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी (झथड) मध्ये ९४ हजार २५१ व आवास प्लस (ड यादी) मध्ये ४१ हजार १९१ असे एकूण १ लाख ३५ हजार ४४२ भूमिहीन लाभाथी असून आतापर्यंत ६६ हजार भूमिहीन लाभार्थ्यांना विविध योजनांतर्गत जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच ६९ हजार ४४२ भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यामध्ये महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर असल्याची माहिती ग्राम विकास व पंचायत राज मंत्री गिरीष महाजन यांनी दिली.
कोणताही भूमिहीन लाभाथी गृहनिर्माण योजनांपासून वंचित राहू नये याकरिता राज्य शासनाने विविध उपाययोजना अंमलात आणल्या आहेत. यामध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, या योजनेअंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना ५०० चौरस फुटापर्यंत जागा खरेदी करण्यासाठी रक्कम रू ५०,००० इतके अर्थसहाय्य पुरविण्यात येत असून आतापर्यंत या योजनेअंतर्गत ३,३०८ इतक्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करून देणे या योजनेंतर्गत २३,५३० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

## आता विद्यार्थ्यांच्या तासिका वाढणार

**गोंदिया:** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे निपुण भारत अभियान अंतर्गत दुसरी ते पाचव्या वर्गातील विद्यार्थ्यांचा बौद्धिक सर्व्हे केला जाणार असून २२ डिसेंबर २०२२ ते ७ जानेवारी २०२३ या कालावधीत राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनाच्या शाळांतील शिक्षकांमार्फतच हा सर्व्हे करण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला इयत्तानिहाय, विषयनिहाय आकलन किती झाले हे पडताळून अभ्यासात पिछाडीवर असलेल्यांसाठी शिक्षकांनी उपचारात्मक अध्यापन करावे, हा त्याचा उद्देश आहे.
गेली दोन वर्षे कोरोनामुळे शाळा बंद राहिल्याने सर्वच विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान झाला. आजही अनेक मुलांना अंकगणित, अक्षर ओळख नसल्याची स्थिती आहे. तेव्हा अशा विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरुन निघावे, व त्यांचा बौद्धिक विकास व्हावा यासाठी हा प्रयत्न करण्यात येत असून या सर्व्हेतून पहिल्यांदा भाषा, गणित, परिसर अभ्यास, इंग्रजी या विषयांचे मूल्यांकन मराठी, उर्दू, इंग्रजी, हिंदीसह एकूण दहा माध्यमांतून केले जाणार आहे. सर्व्हे चाचणीत प्रत्येक विद्यार्थ्यांचा स्वतंत्रपणे मौखिक स्वरूपात आवश्यकतेनुसार लेखी पद्धतीने सर्व्हे होईल. यासाठी राज्यातील सर्व शिक्षकांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने ऑनलाईन मार्गदर्शन करीत सर्व्हेचे निकष निश्चित केले आहेत.
दरम्यान, शिक्षकांकडून आता आपल्या शाळेतील वर्ग दुसरी ते पाचवी पर्यंतच्या अभ्यासात पिछाडीवर असलेल्या विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांचा बौद्धिक सर्व्हे करुन त्यांना श्रेणी दिली जाणार आहे. दरम्यान, अभ्यासात पिछाडीवर असलेल्यांची संपादणूक पातळी वाढावी, बौद्धिक क्षमता विकसीत व्हावी म्हणून त्यांना जादा तास घेऊन अध्यापन केले जाणार आहे.



### असा राहील सर्व्हे

**शिक्षकाने प्रत्येक विद्यार्थ्यांचा वैयक्तिकरित्या समोर बसवून निकोप वातावरणात सर्व्हे करावा. विचारलेल्या प्रश्नाला विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या प्रतिसादानुसार प्रगत (३), प्रवीण (२), प्रगतशील (१) आणि प्रारंभिक (१) या दरम्यानची श्रेणी द्यावी. सर्व्हेत विद्यार्थ्यांना लेखी प्रश्नपत्रिका दिल्या जाणार नाहीत. तसेच विद्यार्थ्यांना सामुहिकरित्या प्रश्न विचारले जाणार नाही. सर्व्हेच्या वेळी वर्गात तणावमुक्त वातावरण राहण्याची काळजी घेण्यात यावी.**

### अधिकारी करणार पडताळणी

**विद्यार्थ्यांना वरची श्रेणी मिळावी म्हणून शिक्षकांनी अतिरिक्त मदत करु नये. अतिरिक्त मदत केल्यास विद्यार्थ्यांचे आकलन नेमकेपणाने समजणार नाही. असे राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने स्पष्ट केले आहे. अध्ययन अभ्यास सर्व्हेतून विद्यार्थी व अध्ययनिष्पती स्पष्ट होईल. शिक्षण विभागातील सर्व अधिकारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील (डायट) अधिकारी, विषय सहाय्यकांनी शाळांना भेटी देऊन सर्व्हेची पारदर्शकता पडताळणी करणार आहेत.**

## गोंदिया-अर्जुनी बस नियमित करा



**अर्जुनी मोरगाव:-** अर्जुनी-मोरगाव-गोंदिया अणि गोंदिया-अर्जुनी मोरगाव ही बस नियमित सुरु होते. परंतु शुक्रवारी ६ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता गोंदियावरुन अर्जुनी मोरगावकडे ही बस आलीच नाही. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांची चांगलीच गैरसोय झाली. मात्र या प्रकारामुळे गोंदिया-अर्जुनी मोरगाव बस नियमित चालवावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्याात आली. अर्जुनी मोरगाव-गोंदिया ही बस दररोज तीन फेऱ्या करते. आधी चार फेऱ्या सुरु होत्या. परंतु ब्रम्हपुरी ते गोंदिया ही बस सुरु झाली तेव्हा या बसची एक फेरी महामंडळाच्या आगाराने कमी केली. नंतर ब्रम्हपुरी बस बंद झाली. तरी चौथी फेरी वाढविण्यात आलीच नाही. या मार्गावर दुसरी बस धावतच नाही. या मार्गावरील बस फेऱ्यांमुळे गोंदिया आगाराला बऱ्यापैकी उत्पन्न मिळते. परंतु यानंतरही या मार्गावर बसफेऱ्या वाढविण्याकडे आगाराचे दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. अर्जुनी मोरगाव ते गोंदिया ही बस दररोज नियमित सुरु करण्यात यावी अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

### अन्यथा रस्ता रोको

**अर्जुनी मोरगाव ते गोंदिया ही बस दररोज नियमित व सुरळीत आली नाही तर रास्ता रोको करण्याचा इशारा अर्जुनी मोरगाव तालुक्यातील प्रवाशांनी दिला आहे.**

### चौथी फेरी वाढवा

**रेल्वे सुटली तर शासकीय, खाजगी कर्मचारी, प्रशिक्षणार्थी, विद्यार्थी व सामान्य नागरिक यांना प्रवास करण्यासाठी एसटीशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही. म्हणून या बसची चौथी फेरी वाढवण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.**

## १५ पशुरुग्णालये झाली आयएसओ

### जिल्ह्यात ७२ दवाखाने: ५३ रुग्णालयातील अधिकारी उदासीन

गोंदिया: आता यांत्रिकीकरण होऊ लागल्याने जनावरांची जागा यंत्राने घेतली आहे. तरी पशुधन किती महत्वाचे आहे, हे पटवून देण्याचे काम जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग करीत आहे. मागील वर्षापर्यंत पशुवैद्यकीय दवाखान्यासंदर्भात जे शेतकरी नाक मुरडत होते, तेच शेतकरी आता येथील सेवांमुळे वर्षभरातच खुश झाले आहेत. शेतकऱ्यांना सर्व सोयीसुविधा देण्यात यशस्वी ठरलेल्या जिल्ह्यातील श्रेणी १ च्या १५ पशु वैद्यकीय दवाखान्यांना आयएसओ प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
गोंदिया जिल्ह्यातील ८० टक्के लोक शेतीवर निर्भर आहेत. शेतीवर निर्भर असलेले लोक शेतीला जोडव्यवसाय म्हणून पशुपालन करतात. त्या पशुंचे संवर्धन करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांना मदत केली जाते. परंतु पाहिजे त्या प्रमाणात शेतकऱ्यांना मदत होत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांना डांग्या व घटसर्प असे विविध आजार होतात. त्यामुळे जनावरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. सोबतच जनावरांना कत्तलीसाठी रवाना केले जात असल्याने जनावरांच्या संख्येत घट होत आहे. या सर्व बाबींवर लक्ष केंद्रीत करुन शेतकऱ्यांच्या पशुंचे संवर्धन करण्यासाठी जिल्ह्यातील ७२ ठिकाणी उघडण्यात आलेले दवाखाने आजही जनावरांना संपूर्ण सेवा देण्यासाठी अपयशी ठरत आहेत.
जिल्हा परिषदेत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी म्हणून वर्षभरापासून रुजू झालेले डॉ. कांतीलाल पटले यांनी जिल्ह्यातील पशु वैद्यकीय दवाखान्यांची स्थिती दुरुस्त करण्याचा विडा उचलला आहे. त्यांनी सर्व डॉक्टरांना मार्गदर्शन करुन त्यांच्याकडून आपआपले दवाखाने उत्तम कसे करता येतील, यावर भर दिला. याचाच परिणाम म्हणून जिल्ह्यातील १५ पशुवैद्यकीय दवाखाने आयएसओ प्रमाणित झाले आहेत.

### हे दवाखाने आयएसओ

**आयएसओ झालेल्या दवाखान्यांमध्ये पांढराबोडी, कारंजा, कामठा, देवरी, आसोली, दासगाव, साखरीटोला, गोऱ्हे, विचारपूर, पुराडा, कडीकसा, कुऱ्हाडी, चोपा, चिरचाळबांध व घाटटेमनी यांचा समावेश आहे.**

### लोकांच्याच खिशाला कात्री



**पशुवैद्यकीय दवाखाने आयएसओ करण्यासाठी त्या दवाखान्याला सुसज्ज करणे आवश्यक असते. त्या दवाखान्यात ज्या-ज्या गोष्टींची गरज आहे. त्या-त्या पुरविणे आवश्यक आहे. शासन एकीकडे आयएसओ करा, अशी ताकीद संबंधित यंत्रणेला देते. परंतु आयएसओ करण्यासाठी त्या दवाखान्यांना गरज असलेल्या वस्तू खरेदी करण्यासाठी पैसे देत नाही. लोकवर्गणी करा किंवा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्वत:च्या खिशातील पैसे टाका, आम्हाला माहिती नाही.फक्त दवाखाने आयएसओ झाले पाहिजेत. या सुत्रामुळे डॉक्टरांनी लोकांच्या खिशाला कात्री लावून हे दवाखाने सुसज्ज केले. डिजीटल शाळांसारखीच स्थिती आयएसओ पशुवैद्यकीय दवाखान्यांची आहे.**

### रुग्णालयांच्या उद्धाराकडे दुर्लक्ष

**गोंदिया जिल्ह्यात श्रेणी १ ते ४२ पशुवैद्यकीय दवाखाने तर श्रेणी २ चे ३० पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. यातील १५ दवाखाने आयएसओ झाले आहेत. तर श्रेणी १ चे २७ व श्रेणी २ चे ३० दवाखाने तसेच पडून आहेत. परंतु त्या दवाखान्यांच्या उद्धारासाठी येथील डॉक्टरांमध्ये तळमळ दिसून येत नाही.**

## राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा

**गोंदिया :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगारांसाठी कामगार केसरी व कामगार कुटूंबियांसाठी कुमार केसरी कुस्ती स्पर्धा दिनांक ५ ते ७ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत बृहन्मुंबई महानगर पालिका, श्रमिक जिमखाना, खेळाचे मैदान, ना.म.जोशी मार्ग, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे.स्पर्धेच्या सर्व प्रवेशिका दिनांक ३० जानेवारी २०२३ पर्यंत प्र. सहायक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय मुंबई येथील कार्यालयात पोष्टद्वारे अथवा ई-मेल द्वारे पाठवावेत. प्रत्येक आस्थापनेने निवडक खेळाडूंना कामगार केसरी/ कुमार केसरी प्रत्येक वजनी गटात प्रवेश दिला जाईल. त्यासाठी आस्थापनेने आपल्या पत्रात त्या खेळाडूंचा उल्लेख करुन प्रवेशिका प्राधिकृत अधिकारांच्या सही शिक्कासह दिलेल्या मुदतीत सादर करावी.महाराष्ट्र कुस्ती स्पर्धा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमाप्रमाणे होतील. सदर स्पर्धा मॅटवर घेण्यात येईल. स्पर्धा बाद पध्दतीने घेण्यात येतील.

# अन् नवेगावबांध संकुल परिसराचा विकास खुंटला

## जिल्हा परिषदेच्या अकार्यक्षमतेचा परिणाम:लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष

**गोंदिया:** जिल्ह्यातील देशाच्या नकाशावर चमकणारा पर्यटन स्थळ, म्हणजेच नवेगावबांध, या ठिकाणी सुंदर असा जैववीवीधतेने नटलेला मालगुजार तलाव, पर्यटन संकुल परिसर व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प असा एकंदरीत जगभरातल्या पर्यटकांना मोहणारा हा परिसर, मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून रेंगाळत असलेल्या या परिसराचा जिल्हा परिषदेच्या अकार्यक्षमतेमुळे विकास खुंटला आहे. विशेष म्हणजे, याला प्रशासन जेवढे जबाबदार आहेत. तेवढेच जबाबदार शासनकर्ते व लोकप्रतिनिधीदेखील आहेत.
राज्यात महाविकास आघाडीची सरकार असताना २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये राज्यसभा खासदार प्रफुल पटेल व आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या पाठपुराव्याने संपूर्ण गोंदिया जिल्ह्यामध्ये प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रम २०२१-२२ कार्यक्रमांतर्गत नवेगावबांध संकुल परिसराच्या विकासाकरिता पर्यटन विभाग राज्य सरकार यांनी १ कोटी ५० लाख रुपयाच्या निधीला प्रशासकीय मंजुरी दिली. या निधीत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून अंदाजपत्र तयार करताना नवेगावबांध पर्यटन संकुल येथे मनोहर उद्यानात पायवाट रस्त्याच्या बाजूला कॅरी तयार करणे १२.५० लाख रुपये, मनोहर उद्यानात रबर मोल्ड ग्लोसि ब्लॉक लावणे १५ लाख, भुलभुलैय्या बगीचा तयार करणे १२ लाख, सुशोभित गेटचे बांधकाम करणे १३ लाख ५० हजार, पर्यटकांना बसण्याकरिता विविध प्रकारचे ओटे बनविणे १२.५० लक्ष, सपाटीकरण व सौंदर्यकरण १५ लाख, हिलटॉप गार्डन कडे जाणा?या रस्त्याच्या बाजूला पेवर ब्लॉक लावणे व सौंदर्यकरण करणे १४.६० लाख, संकुल परिसरामध्ये राग गार्डनची दुरुस्ती करणे व सौंदयीकरण करणे १० लाख, रॉक गार्डन जवळील परिसराला सपाटीकरण व वृक्ष लागवड करणे १० लाख, संकुल परिसरातील जे-टीप पॉईट जवळील चौपाटीचे विस्तारीकरण करणे १५ लाख, हिलटॉप गार्डन परिसरामध्ये बालोद्यान निर्माण करुन खेळणी साहित्य लावणे १० लाख, असे एकूण १ कोटी ५० लक्ष रुपयाचे काम नवेगावबांध पर्यटन संकुल सौंदर्यीकरण व विकास काम ाकरिता २०२१-२२ या आर्थिक वर्षात खा. प्रफुल पटेल यांच्या पाठपुराव्याने मंजूर झाले होते.



### वेळ पडल्यास न्यायालयात जाणार

**नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये नवेगावबांध येथील जनतेने सरपंच म्हणून निवडून दिले. पर्यटन विकास कामाबाबत सविस्तर माहिती घेऊन, शासनाला पाठपुरावा करून ताबडतोब जिल्हा परिषदेत मार्फत करारनामे पूर्ण करण्यासाठी आग्रह धरण्यात येईल, व नवेगाव बांध येथील पर्यटन विकासाकरिता ग्रामपंचायतकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. वेळ पडल्यास पर्यटनासारखा मुद्दा असल्यामुळे आम्ही याला न्यायालयातून दाद मागण्यासाठीही तयार आहोत.**
**हिराबाई नीलम पंधरे, सरपंच, नवेगावबांध**



### जि.प.च्या हेकेगिरीमुळे अडथळे

**सदर काम ताबडतोब सुरूझाले पाहिजे याकरिता नवेगाव बांध पर्यटन विकास समितीमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. राज्य शासनाचा यामध्ये कुठलाही हस्तक्षेप नाही, राज्य शासनाने काढलेले पत्र करारनामा प्रक्रिया सुरूनसलेल्या कामासाठी होते, परंतु या कामाची करारनामा प्रक्रिया संपूर्ण झालेली आहे. मात्र, जिल्हा परिषदेची हेकेगिरी या विकास कामांमध्ये अडथळा निर्माण करत आहे त्यामुळे सदर विकास कामाचे करारनामे अजून पर्यत कार्यारंभ आदेश ग्राम पंचायतला प्राप्त झाले नाहीत.**
**कशोर तरोणे माजी जिल्हा परिषद सदस्य नवेगाव बांध**

सदर कामांचे जिल्हा परिषदेमार्फत अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली. तर ग्रामपंचायत नवेगावबांध काम करण्यास तयार असल्यामुळे सदर कामाचे करारनामे करण्याकरिता पैसे भरणा करुन रीतसर पावती उपलब्ध करुन देण्यात आली, त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडून या संपूर्ण कामाला वित्तीय सहमती सुद्धा प्राप्त झाली. मात्र, राज्यात सत्तांतरण झाले तर दुसरीकडे जिल्हा परिषदेतही भाजप व राष्ट्रवादी प्रेरित सत्ता आली या सत्ता समीकरणाचे कुठे काय पाणी मुरले माहित नाही, परंतु कुठलेही कारण नसताना नवेगावबांध पर्यटन संकुलातील संपूर्ण बाराही बांधकामांचे करारनामे तांत्रिक व वित्तीय सहमती अजुनपर्यंत ग्रामपंचायतला उपलब्ध करण्यात आले नाही. वारंवार सामाजिक कार्यकर्त्यांकडून जिल्हा परिषदेला पाठपुरावा करण्यात येत असताना याबाबत कुठलाच उत्तर प्राप्त होत नाही, शासनाद्वारे कामांना स्थगिती आली असे सांगण्यात येत असतानाच शासनाने सदर पर्यटनाच्या कामावर कुठलीच बंदी घातलेली नसल्याचे कळते, सर्व काही ऑल इज वेल असताना व जिल्ह्यामध्ये पर्यटन वाढीची गरज असताना नवेगावबांध येथील पर्यटन संकुल परिसरात होणारे हे विकास कामे का बरं थांबवण्यात आले याबद्दल कोणीच बोलायला तयार नाहीत, कधी ग्रामपंचायती निवडणुकांचे आचारसंहिता तर कधी कार्यकारी अभियंत्यांच्या बदल्या तर कधी आमदारांचे हस्तक्षेप तर कधी बांधकाम सभापतीचे हस्तक्षेप असे कारण सांगून सदर कामांच्या करारनाम्याला दिवसेंदिवस लांबणीवर टाकण्यात येत आहे. त्यामुळे नवेगावबांध पर्यटन संकूलाचे विकास रेंगाळले असून लोकप्रतिधींचे याकडे मात्र, दुर्लक्ष होत आहे.

## संपादकीय

# सहकारी बँका ग्राहकांकरीता किती सुरक्षित

सहकार जिंकला पाहिजे, सहकारात राजकारणाचे जोडे बाजूला ठेवले पाहिजेत, या भावनेतून अनेक दिग्गज्जांच्या पुढाराने महाराष्ट्रात सुरु झालेली सहकारी चळवळ आता धापा टाकत आहे. या चळवळीतून अस्तित्वात आलेल्या आणि महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा ठरलेल्या सहकारी बँका, सोसायट्या, सहकारी साखर कारखाने यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याचेच निदर्शनास येते आहे. राजकीय हेतू ठेवूनच सहकारात प्रविष्ट झालेल्या अनेक नेते मंडळी आणि राजकीय पक्षांनी सहकाराच्या जाळ्याचा वापर आपली खाबुगिरी पूर्ण करण्याकरताच केला. त्यातून कोट्यवधीच्या आर्थिक घोटाळ्यांची मालिकाच सुरु झाली. सहकारी चळवळ भरभराटीस आल्यानंतर पुढील दोन–तीन दशके ग्रामीण अर्थव्यवस्थांची नाडी सहकारी पतपेढ्या, सहकारी बँका आणि सहकारी संस्थांच्या हातात होती. शहरी भागातसुद्धा नागरी पतपेढ्या, नागरी सहकारी बँका उदयास येऊन मध्यम वर्ग, निम्न मध्यम वर्ग, कामगारवर्गाचे आर्थिक व्यवहार त्यांच्यामार्फत होऊ लागले. रिझर्व्ह बँकेने शेती कर्ज डिपार्टमेंटस स्थापून दरवर्षी सहकारी संस्थांची आकडेवारी प्रसिद्ध करणे, दहा वर्षांतून एकदा राष्ट्रव्यापी सर्वेक्षण करून पॉलिसीमध्ये आवश्यक ते बदल करणे सुरू होते. रिझर्व्ह बँकेला सहकारी चळवळीबद्दल आस्था आहे हे जाणवत होते. सध्या उलट परिस्थिती आहे. सहकारी बँकांना आपण नावडतीची मुले आहोत असे वाटते. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार आज देशभरात एकूण ५३ शेड्युल्ड नागरी सहकारी बँका, तर ३१ राज्य सहकारी बँका आहेत.

सहकारी पतपेढ्या सुमारे ५० हजारांहून अधिक आहेत. रिझर्व्ह बँकेने सध्या देशातील ४४ नागरी सहकारी बँकांवर निर्बंध घातलेले असून, नऊ बँकांवर कारवाईही केलेली आहे. पणजी येथील "म्हापसा सहकारी बँक", ठाणे येथील "सीकेपी सहकारी बँके"वर २ मे रोजी रिझर्व्ह बँकेने परवाना रद्द करून, बरखास्तीची कारवाई केली आहे. मुंबईतील "मराठा सहकारी बँके"वर ३१ ऑगस्ट २०१६ पासून रिझर्व्ह बँकेने निर्बंध घातले आहेत. मुंबईतील कपोल सहकारी बँक, उस्मानाबाद येथील वसंतदादा नागरी सहकारी बँक, रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन, कर्नाळा अर्बन बँकेयासह अनेक बँकांचे भवितव्य सध्या न्यायालयीन प्रक्रियेत आहे.

नुकतेच, गेल्या सलग तीन वर्षांपासून तोटा नोंदविणाऱ्या व निव्वळ मालमत्ता रोडावलेल्या "लक्ष्मी विलास बँके"वर निर्बंध आले आहेत. ठेवीदारांना गरजेसाठी महिन्याभराकरिता २५ हजार रुपये काढण्याची मुभा मिळालेल्या बँकेचे डीबीएस या विदेशी बँकेबरोबरचे विलिनीकरण होणार आहे. लक्ष्मी विलास बँकेनंतर रिझर्व्ह बँकेने जालना जिल्ह्यातील "मंथा अर्बन को–ऑपरेटिव्ह बँके"वर निर्बंध घालण्यात आले आहेत. अनेक सहकारी बँकाची आर्थिक स्थिती बिकट आहे. गेल्या तीन वर्षांपासून अकाऊंट बुक्सही कमकुवत आहेत. बुडीत कर्जे आणि सुशासनाचा अभाव यामुळे एकापाठोपाठ एक बँका डबघाईला येत आहेत. याआधी पंजाब महाराष्ट्र को–ऑप. बँक आणि येस बँक यांच्यातील अनियमितता यामुळे आरबीआयला त्यांच्यावर निर्बंध लादावे लागले होते. पंजाब महाराष्ट्र को–ऑप. बँकेवरचे निर्बंध अद्यापही कायम आहेत. त्यामुळे खातेदारांना हाल सहन करावे लागत आहेत. तोट्यात असलेल्या आणि शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्यास सक्षम नसलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे राज्य शिखर बँकेत विलिनीकरण करण्यात यावे, असे मत विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ मध्येच व्यक्त केले होते.

त्यावेळी राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँकांपैकी ११ तोट्यात होत्या, तर ९ बँकांची स्थिती अत्यंत नाजूक होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी आणि शेतकऱ्यांना पतपुरवठा व्हावा यासाठी फडणवीस यांनी तोट्यातील सहकारी बँकांच्या विलिनीकरणासंदर्भात सूचना केली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी रोजी लोकसभेपुढे अर्थसंकल्प ठेवताना हे सूचित केले होतेच की, सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्ण नियंत्रणाखाली आणले जाणार आहे. त्यानुसार, नागरी सहकारी बँकेचे बहुतांश नियंत्रण रिझर्व्ह बँकेकडे देण्यात आले आहे. रिझर्व्ह बँकेला बरेचसे अधिकार या वटहुकुमामुळे मिळाले असले, तरी रिझर्व्ह बँक वेळोवेळी आणि गरज लागेल तेव्हा परिपत्रके काढून हे अधिकार वापरेल, हेदेखील स्पष्ट झाले आहे. रिझर्व्ह बँकेच्या आर. गांधी समितीने २०१५ मध्ये केलेल्या तीन शिफारसीदेखील फार महत्त्वाच्या आहेत. १०० कोटीच्या लहान लहान सहकारी बँकांना त्यांची इच्छा असेल, तर स्मॉल फायनान्स बँकेत बदलता येईल व परवाना मिळेल. त्या दिवशी अशा स्मॉल फायनान्स बँकांना व्यापारी बँक व शेड्युल्ड दर्जा मिळेल. यानुसार अनेक सहकारी बँका बदलत आहेत. येणाऱ्या काळात रिझर्व्ह बँक, वरील सर्व बाबींकडे कसे पाहते आणि वटहुकुमाने मिळालेले अधिकार कसे वापरते, हे पाहावे लागेल.

छोट्या छोट्या नागरी सहकारी बँकांना आपल्या कारभारात अधिक व्यावसायिकता आणणे आवश्यक ठरणार आहे. १९९१ मध्ये देशाच्या अर्थनीतीमध्ये क्रांतिकारी बदल झाले. तोट्यातील बँक शाखांना बंद करण्यास परवानगी मिळाल्यामुळे ५ हजार शाखा बंद झाल्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले. नवीन आर्थिक धोरण म्हणजे आम जनतेला उपलब्ध असलेली बँकिंग सेवा बंद करणे, अशी टीका होईल म्हणून सहकारी बँकांना जाळे पसरण्यास उत्तेजन देण्यात आले. परिणामी १९९१ ते २००४ पर्यंत नागरी सहकारी बँकांची संख्या झपाट्याने वाढून १९२६ झाली. मार्च २०१९ मध्ये नागरी सहकारी बँकांची संख्या ३८२ ने कमी होऊन १५४४ वर आली. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत सहकारी संस्थांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले गेले. नागरी सहकारी बँका, पतपेढ्या वेगवेळ्या प्रकारच्या सहकारी संस्था सरकार आणि रिझर्व्ह बँक सहन करत आहे असे वातावरण झाले.

डॉ. रघुराम राजन आणि डॉ. ऊर्जित पटेल हे गव्हर्नर असताना सहकारी बँकांबद्दल त्यांनी शब्दही उच्चारला नाही. उलट रघुराम राजन यांनी पेमेंटस बँका, स्मॉल फायनान्स बँका स्थापण्यासाठी बड्या उद्योजकांना मुक्तपणे परवानगी देऊन सहकारी बँकिंगला स्पर्धा निर्माण केली. सध्याचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी अंब्रेला ऑर्गनायझेशनला होकार दिल्यावर अनेक सहकारमहर्षी त्याचे श्रेय लाटायला पुढे आले. अन्य सरकारी बँका, खासगी बँका, नवीन स्थापन झालेल्या बँका यांना पूर्वीचेच नियम लागू आहेत. केवळ नागरी सहकारी बँकांनाच का धारेवर धरले जात आहे? हे न उलगडणारे कोडे आहे. सध्याच्या काळात महाराष्ट्रातील सहकारी बँकासमोर टिकून राहण्याचे आणि चोखपणे व्यवहार करण्याचे मोठे आव्हान आहे. वाढती स्पर्धा, आरबीआयचे बदलते नियम, त्यानुसार असणारा अंकुश आणि हळूहळू संपुष्टात येत असणारी स्वायत्ता, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पसरत चाललेले राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय बँकाचे जाळे, डिजीटल बँकींगच्या सुविधा, बँक सेवेतील आमुलाग्र बदल, राजकीय दबाव आणि प्रभाव आदी अनेक कारणाने सहकारी बँकाचे विश्व घुसळते आहे. या सर्व स्पर्धेत सेवा देताना सहकारी बँकांना विश्वासार्हता टिकवण्यासाठी मोठी कसरत करावी लागते आहे. आरबीआय आणि केंद्र सरकारच्या नव्या धोरणामुळे तरी सहकारी बँकांना अपेक्षित उर्जितावस्था मिळेल काय आणि ग्रामीण भागाची अर्थवाहिनी म्हणून त्या अधिक सक्षमतेने कार्यरत राहतील काय हाच खरा प्रश्न आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# सत्यशोधक यशवंतराव खुशालराव देशमुख (वेलुरा)

अमरावती जिल्ह्यातील करजगाव सत्यशोधक चळवळीचे केंद्र होते. विदर्भातील सत्यशोधकांची अधिकृत प्रथम शाखा येथेच स्थापन झाली होती. त्याचप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुकासुद्धा सत्यशोधक ब्राह्मोतेत्तर चवळळीचा एकेकाळी बालेकिल्ला होता. या तालुक्यातील यशवंतराव खुशालराव देशमुख, काशीराव बापू देशमुख, नारायण अमृतकर वकील व यादवराव शामराव गुंड यासारखे सत्यशोधक समाजाचे बीनीचे शिलेदार होते. अमरावती हे पश्चिम विदर्भातील शिक्षणाचे माहेरघर, कृषीक्रांतीकारक पंजाबराव देशमुखांची व शिवाजी शिक्षण संस्था ही महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व राजकीय वारसा चालविणारी शिक्षणसंस्था, प्रबोधनाचे चालते–बोलते विद्यापीठ असणारे गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, समाज क्रांतीकारक गणपती महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रभावीत झालेला परिसर, जिल्ह्यातील खेडयापाड्यात पसरलेले विसाव्या शतकाच्या पूर्वाधात पोहोचलेले सत्यशोधक चळवळीचे कार्य, करजगाव, शिरजगाव (कसबा), शिरजगार बंड, बेलुरा, नायगाव, मंगरूळ दस्तगीर व दाढी, कावली, शिंगणापूर अशा कितीतरी खेड्यातून सत्यशोधकी विचारांचे आंदोलन पेटलेले दिसते. आजही त्याच्या खाणाखुणा व रूजलेली पाळेमुळे पाहावयास मिळतात.

बेलुरा हे असेच मोर्शी तालुक्यातील गाव, आज चांदूर बाजार तालुक्यातील पेढी नदीवर वसलेले आणि महानुभवपंथीयांचे मुळ स्थान असलेल्या रिद्धपूर पासून दोन–तीन किलोमीटरवर असणारे, एकेकाळी सत्यशोधक चळवळीने झपाटलेले बेलुरा, तालुक्यातील सर्वांत मोठे सामुदायिक केंद्र, तालुक्यात साक्षरतेत सर्वोच्च असणारे पंचपतराव डवरे, आनंदराव लढके, नलिनीताई लढके, उत्तमराव कडू, नथ्थूजी खोंड अशी सत्यशोधक चळवळीतील खंदी कार्यकर्ती मंडळी, महात्मा जोतीराव फुलेंच्या विचाराने व कृतीने प्रभावीत गाव, स्वातंत्र्यचळवळीत मोठ्या संख्येने सहभागी मंडळी. कम्युनिस्ट चळवळीचे आंदोलन भाई मधुकर उतखेडे, विधान परिषदेत सर्वाधिक वेळी निवडून जाणारे अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार बी.टी. देशमुख, प्रहार संघटनेच्या माध्यमातून आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे आमदार बच्चू कडू, अशी कितीतरी ज्ञात–अज्ञात मंडळी या गावात जन्मली व कार्यकर्तृत्वाने मोठी झाली. अशा मोठ्या माणसांचे गव बेलुरा होय. याच गावात यशवंतराव खुशालराव देशमुख यांचा जन्म झाला. पाच फुट उंचीचा हा माणूस अतिशय विद्वान व धाडासी होता. कैचीची गुलाबी पडगी व अंगात पांढरा अंगरखा चढवून ही स्वारी घोड्यावर बसून बाहेर पडली म्हणजे आसपासच्या गावातील लोक त्यांना लून मुजरा करायचे. यशवंतराव बापूंनी भगवद्गीता, अरण्यके, उपनिषदे इत्यादी ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. बेलोनऱ्यापासून दोनच मैलावर उत्तरेकडे असलेले महानुभाव पंथाचे रिद्धपूर हे तीर्थक्षेत्र आहे. संपूर्ण भारतातील महानुभाव रिद्धपूरला आपल्या संप्रदायाची काशी मानतात. महानुभाव पंथियांचा गीतेवरील व्यासंग दांडगा होता. गीतेवरील बहुतेक मराठी टीका महानुभावानीच लिहिल्या. यशवंतराव बापू म्हणत असत की, मराठीतील प्रसिद्ध टीका जी ज्ञानेश्वरी ती ज्ञानेश्वर सुद्धा नावाच्या महानुभावानेच लिहिली. सुरुवातीच्या आयुष्यात त्यांचेवर महानुभाववादयाचा बराच पगडा बसला होता. परंतु खामगावच्या मराठा शिक्षण परिषदेतील शाहू महाराजांच्या क्रांतीकारक विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला.व उत्तर आयुष्यात ते जवळजवळ निरीश्वरवादी बनले.

विदर्भातील अस्पृश्यात निवारणाची चळवळ सुरु करणारा हा पहिला महापुरुष होता. असे दौलतराव गोळेकाका म्हणतात. यशवंतरव देशमुखांनी लहानपणापासूनच वैदिक धर्मग्रंथातील समस्येविरुद्ध बंड पुकारले. बापूंच्या घरात अस्पृश्य जातीचा स्वयंपाकी महार होता. असापासची सारी स्पृश्य जमात बापूंच्या नावाने शंखनाद करीत असे. पण यशवंतराव बापूंनी त्यांना दाद दिली नाही.

यशवंतराव देशमुख यांची जन्मतारीख उपलब्ध होऊ शकली नाही. परंतु २ जानेवारी १९२८ या दिवशी त्यांचा मृत्यू झाल्याची नोंद त्यांच्या घरातील त्यांच्या छायाचित्रावरुन कळते. यशवंतराव देशमुख यांना माधवराव व धर्मवीर नावाचे दोन मुले होते. धर्मवीर यांना गोपाळराव, बाळासाहेब मुकुंदराव व वैकुंठराव असे तीन मुले होते. मुकुंदराव यांना धनंजय देशमुख व उदय देशमुख अशी केला होता. मुले असलही माहिती दादाजी देशमुख यांनी मुलाखतीत दिली.

१९०० साली ओतुरचे दोन सत्यशोधक मराठा गृहस्थ शास्त्री नारोबाबाजी महाघट व शास्त्री धर्माजी रामजी डुंबरे पाटील हे वऱ्हाडप्रांतात आले. त्यांनी वाडेगाव येथे १९०१ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. १९०५ साली बडोदावत्सल छापखान्यातून वाडेगाव येथील सत्यशोधक मंडळींनी ब्राम्हणेत्तर जातीच्या कल्याणाकरिता जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये वऱ्हाड प्रांतात स्थापन झालेल्या सत्यशोधक समाजाच्या शाखेच्या कार्याचा वृत्तांत आहे.

वऱ्हाड व नागपूर प्रांतात सत्यशोधक समाजाचे नियमाग्रमाणे म्हणजे या काढलेल्या जाहिरनाम्याप्रमाणे वर्तन करीत आहेत. समाज १९०१ जानेवारीमध्ये वऱ्हाड प्रांतात स्थापन झाला. त्यामध्ये बेलुरा येथे सत्यशोधक समाजाचे मताप्रमाणे मोठ्या प्रमाणावर कामे सुरु असल्याची नोंद आहे. यावरुन बेलुरा सत्यशोधक समाजाचे काम जोरात होते, असे दिसते. १८८४ साली जयराम महेरे, नारायणराव तडस, राजाराम बापू देशमुख, यशवंतराव देशमुख, बळीराम पाटील, नानासाहेब चौधरी यांनी शिरजगाव बंड, जि.अमरावती येथे इंग्रजी शाखेचे अध्यक्ष होते. मिडल स्कूल सुरु केले होते. ही प्रेरणा निश्चितच सत्यशोधकी होती. ही मंडळी नंतर सत्यशोधक चळवळीत सक्रीय झाली. १८८४ सालीच बेलुरा येथे यशवंतराव देशमुख यांनी सर्व जातींच्यासाठी सत्यशोधक ग्रंथ तयार केला होता.

ना.रा. शेंडे यांच्या चरित्रग्रंथावरुन जरी या ग्रंथास सत्यशोधक ग्रंथ म्हटले असले तरी तो त्या विचाराचा असावा. कारण सत्यशोधकी साहित्य नावाची निर्मिती १९०० नंतर विदर्भात झाली. तरी विचारदृष्ट्या हा ग्रंथ सत्यशोधकी असावा, असे म्हणता येईल.

पुजापद्धती भाग १ ते २ या ४७ पृष्ठांच्या पुस्तिकेचे शास्त्री नारोबाबाजी महाघट आणि शास्त्री धर्माजी डुंबरे पाटील हे ओतूरकर सत्यशोधक लेखक आहेत. सदरील पुस्तिकेची पहिली आवृत्ती सन १९०२ ला प्रकाशीत झाली. या पुस्तकाची एकच आवृत्ती निघाली. पुस्तकाचे हक्क सत्यशोधक प्रसारक मंडळीच्या स्वाधीन आहेत. बडोदा वत्सल, छापखाना बडोदा येथून लेखकाने स्वत: प्रकाशीत केली आहे. हे पुस्तक बेलुऱ्याचे यशवंतराव खुशालराव देशमुख यांना अर्पण केले आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या एकुण ४७ आहे. पुजापद्धतीची माहिती या पुस्तकात आहे. बहुजनसमाजास सत्यशोधक तत्वज्ञानचा परिचय व्हावा ते त्याच्या पचनी पडावे, या उद्देशाने ही पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. ब्राह्मोतरांनी स्वत:चे धार्मिक विधी स्वत: करावे म्हणूनही सुचविले आहे. यशवंतराव बापू देशमुख हे त्यावेळी बेलुरा शाखेचे अध्यक्ष होते.



शेतकऱ्याला विहिरीतून पाणी काढणे सोयीचे व्हावे, म्हणून भालेकरांनी इ.स.१९०४ मध्ये विहिरीतून पाणी काढण्याचे यंत्र शोधण्याच्या कामी गढून गेलेले होते. या कामी त्यांना प्रथमत: वऱ्हाडातील सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष भगवंतराव कांडलकर व यशवंतराव खुशालराव देशमुख यांनी सहाय्य केले. जबलपूरच्या वॉटरवर्क्सचे इन्सपेक्टर दादाजी हिराजी कवळे यांनीही त्यांना पुष्कळ सहाय्य केले. पाणी खेचण्याच्या पंपाविषयी भालेकरांनी चिंतन केले व त्याची टिपणे काढली. पंपाचे आराखडे स्केचेस) तयार केले. प्रत्येकवेज़ी आलेल्या अनुभवाच्या पद्धतशीर नोंदीही केल्या. इ.स.१९०४ च्या जुलै महिन्यात बेलुरा, जि.अमरावती येथे यशवंतराव देशमुख यांच्या मदतीने त्यांनी विहिरीतून पाणी काढण्याचे यंत्र प्रयोग केले.

विहिरीतून पाणी खेचण्याचा पंप कार्यान्वित करण्याची भालेकरांची खटपट इ.स.१९०५ पयरंत चालू होती. याच काळात भालेकरांनी समाजकार्यासाठी बेलुरा ते जबलपूर व जबलपूर ते बेलुरा असेच बरेच दौरे मारीले. यावरुन भालेकरांचा व बेलुरा येथील यशवंतराव देशमुख यांचा घनिष्ठ संबंध होता असे दिसते.

वऱ्हाडकर मंडळींनी कृष्णराव भालेकरांना सत्यप्रकाश नावाचे वर्तमानपत्र काढू असे आश्वासन दिले होते. त्यामध्ये खुशालराव सूर्यभानजी होती. पाटील (कावलीकर), रामराव पाटील यांच्याबरोबर यशवंतराव खुशालराव देशमुख हे सुद्धा होते. अकोला येथे असतानासुद्धा भालेकरांचा यशवंतराव खुशालराव देशमुख यांच्याशी पत्रव्यवहार चालू असे हे काम पुढे तडीस गेले नाही असे दिसते.

सत्यशोधक शाहीर भीमराव महामुनी यांचे बेलुरा येथे १ जानेवारी १९०५ रोजी भीमपुराण झाले. बेलुरा येथील सत्यशोधक समाजशाखेचे अध्यक्ष यशवंतराव खुशालराव देशमुख, राजाराम भगवानजी डवरे, कृष्णाजी सोनाजी कोरडे यांनी उत्साहित होऊन भीमरावांना प्रशस्तीपत्र दिले. यावरुन यशवंतराव देशमुख यांनी जलशातून गावातील लोकांचे प्रबोधन केल्याचे दिसते. पुढे त्यांच्याच प्रेरणेतून बेलुऱ्यात सुद्धा सत्यशोधक जलशाची निर्मिती झाली होती. येथे दोन जलसे तयार झाले होते. नथ्थुजी खोंड, विधाते व गुलाबराव चौधरी यांच्या जलशाचे बऱ्याच ठिकाणी प्रयोग झाले होते. त्यामुळे लोकजागृती झाली आहे. दुसरा जलसा उत्तमराव कडू यांचा होता. त्यांच्या जलशाने सुद्धा विद्येचे महत्व, शेतकऱ्यांची लुबाडणूक हे फार्स रचून जलसे सादर केले.

जलशामध्ये नथ्थूजी आनंदराव खोंड पाटील हे सत्याजीचे काम करीत होते. त्यांचा जन्म १.११.१९०२ तर मृत्यू ११.१२.१९७१ ला झाला. शंकरराव विधाते नाच्याचे काम करायचे. त्र्यंबकराव जोशी पेटीवादक म्हणून काम करायचे. शामराव नारायणजी राऊत, अजाबराव राऊत ही मंडळीसुद्धा जलसात काम करीत होती.

पुण्यात होणाऱ्या सत्यशोधक अधिवेशसनासंबंधी संपूर्ण सत्यशोधक मतपत्रांना पत्राद्वारे मत कळवीत असत. असेच पत्र २१ डिसेंबर १९१० दिनमित्र च्या अंकात विदर्भातील कृष्णाजी कर्काजी चौधरी यांच्यासोबत यशवंत खुशालराव देशमुख बेलुरा यांच्या पत्रवळा सुचना दृष्टीस पडतात.

सन १९९९ पासून सत्यशोधक समाजपरिषदा सुरु झाल्या. त्यामध्ये यशवंतराव देशमुख उपस्थित होते किंवा नाही कळत नाही. परंतु पहिली सत्यसमाज परिषद, बालिवाडा थिएटर पुणे ता.१७ एप्रिल सन १९११ ला स्वामी व्यंकय्या आय्यावारु यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये ठराव क्र.१३ नुसान सत्यसमाजाचे उद्देश पार पाडण्यासाठी व ती चळवळ नेहमी चालू ठेवण्यासाठी पुढील गृहस्थांचे एक नाहीत. १७ नियामक मंडळ नेमण्यात येत आहे, असे म्हटले आहे. त्यामध्ये सभासद म्हणून यशवंतराव खुशालराव देशमुख यांचे नाव आहे.

दुसरी सत्यसमाज परिषद नाशिक येथे ता. १५ एप्रिल १९९२ ला झाली. त्यामध्ये फंडाचा तपशील १ रा. यशवंतराव खुशालराव देशमुख, बेलुरा यांच्याकडून १९११ साली आलेल्या रकमा असा उल्लेख आहे. त्यामध्ये किती फंड आला हे लक्षात येत नाही. चौथी सत्यसमाज परिषद, सासवड ता. २५ व २६ एप्रिल १९९४ ला झाली. त्यामध्ये ठाव क्र.६ नुसार सत्यसमाजाचे उद्देश पार पाडण्यासाठी एक कार्यकारी मंडळ नेमले होते. त्यामध्ये सुद्धा यशवंतराव देशमुख बेलुरा सभासद होते.

१९१७ च्या ७ व्या परिषदेच्या आलेल्या शाखांच्या अहवालानुसार अमरावती जिल्ह्यातील बेलुरा हे गाव खेडेगाव सत्यशोधक केंद्र असल्याची नोंद मिळते. तर बेलुरा मधील चळवळीबाबत अमरावती गॅझीटेअर मध्ये त्यावेळेस अधिकृत अहवाल असा होता. सत्यशोधक नावाचा छोटासा ग्रंथ स्थानिक प्रमाणावर कुणबी समाजात यशवंत खुशालराव पाटील (देशमुख असावे) यांच्या पुढारीपणाखाली सुरु करण्यात आला आहे. त्यांचे उद्दीष्ट महार व मांग यांसकट मागासलेल्या जमातीमध्ये शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि ब्राह्मणांचे वर्चस्व उडवून लावणे असे आहे. असे म्हणतात. या पंथाचे सभासद, त्यांच्या घरे धार्मिक सभारंभ करण्याकरिता ब्राह्मणांना बोलवीत नाहीत.

वरील गॅझेटिअरच्या अहवालानुसार पाटील हा शब्द देशमुख यासाठी इंग्रज पर्यायी वापरीत असावेत किंवा यशवंतरावांकडे गावाची पाटीलकी असावी. सत्यशोधक ग्रंथ ऐवजी तो सत्यशोधक समाज असावा. त्यावेळी बेलुऱ्याची लोकसंख्या १९२१ च्या खानेसुमारीनुसार २०५७ इतकी होती. एकंदर या गावात सत्यशोधक चळवळीचा बोलबाला होता एवढे निश्चितपणे दिसते.

वाशीम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील कुपटा या गावी सत्यशोधक समाजाची तत्वे या विषयावर ३ जून १९२५ ला यशवंतराव बापू खुशालराव देशमुख यांचे व्याख्यान झाले होते. त्यांच्याच प्रेरणेने कुपटयाच्या मंडळींनीसुद्धा जलसा तयार केला होता. बेलोऱ्यात पुंजाजी महाराजकृत दत्तजयंती होत असे. त्यात गोपालकाला, दहीहांडी होत असत. हे जातीभेद मोडाा म्हणून करीत असत. यशवंतराव बापू नंतर त्यांचे लिहिले आहे. मुले ही जयंती साजरी करीत होती. मंगरूळ दस्तगीरचे गणपती महाराज व त्यांचे चिरंजीव दादाजी उर्फ ज्ञानेश्वर महाराज वातोंडा हिमतपूर हे ही याच पद्धतीने जातीभेद मोडण्यासाठी गोपालकाल्याचा वापर करीत असत.

चवळळीसोबतच यशवंयराव देशमुख यांनी साहित्यनिर्मितीसुद्धा केली. त्यांची सत्यशोधक समाज, पुष्प १ ले आवृत्ती पहिली सन १९२९ किंमत ६, आणे पृष्ठ १८ ही पुस्तिका माधोराव यशवंतराव देशमुख यांनी बाळाभारत छापखाना, अमरावती येथे प्रसिद्ध केली. या पुस्तिकेत बकाराम कृष्णाजी पाटील वणीकर यांची प्रस्तावना लाभली आहे. देशोद्धार असे या पदाचे नाव आहेत. एकुण १५ पदे असून त्यामध्ये प्रत्येक पदासोबत विची चालही नमूद केली आहे. १९२९ साली याची पहिली आवृत्ती प्रकाशित झालेली आहे. परंतु यशवंतराव देशमुख यांच्या छायाचित्रावर १९२८ ही त्यांची मृत्युतारीख आहे. त्यांच्या मृत्यूनंतर ही पुस्तिका प्रकाशित केली का? असा प्रश्न पडतो. त्यांचे ज्येष्ठ पुत्र माधोराव हे या पुस्तिकेचे प्रकाशक आहेत. कदाचित मृत्यूतारीख व प्रकाशन तारीख असापासची असावी, असे वाटते. याचाच अर्थ मृत्यू येईपर्यंत त्यांनी अस्पृश्यता निवारण, सत्यशोधक समाज कार्याची साथ सोडली नव्हती. १९२८ ही मृत्यू तारीख असली तरी त्यांचा मृत्यू हृदयक्रिया बंद पडून २१ जानेवारी १९२९ रोजी झाला असे दीनमित्र मध्ये नमूद आहे हे वृत्त बकाराम कृष्णाजी पाटील वणीकर यांनी एक महावीर गेला या मथ्ळ्याखाली लिहिले आहे.

देशोद्धार विषयी अशोक चोपडे लिहितात की, बापूंची देशोद्धाराची प्रेरणा या पदातून स्पष्ट होते. एकूण ४,५,६,७,८,९,१०,११ व १३ अशी १० पदे अस्पृश्योद्धाराच्या संदर्भात तात्विक चर्चा करणारी आहे. १८८२ पासूनच त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य त्यांनी केले आहे, असे दिसते. समता प्रस्थापित करण्यासाठी ही त्यांनी लिहिली आहे. यशवंतराव देशमुख म्हणतात मी देशमुख असलो तरी महारच आहे. मी तुम्हाला शिवत नाही तसेच धर्माचा संदर्भ: पुढारी मला शिवत नाही, असे महत्वपूर्ण वक्तव्य त्यांनी केले आहे.

एकूणच यशवंतराव देशमुख यांच्या कार्याचा व त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा आढावा घेताना असे दिसते की महानुभाव पंथाच्या विचाराने ते सुरुवातीला प्रभावीत झाले. नंतर मात्र महानुभवासोबत ते सत्यशोधक चळवळीत सहभागी झाले. ३ उपरोक्त पृ.१५ अस्पृश्य उद्धारासाठी त्यांनी फार मोठे कार्य केले. कृतीतून घडवून आणले, नारोबाबाजी महाधट व डुंबरे पाटील, भीमराव महामुनी यांच्यापासून ते कृष्णराव भालेकर, दिनभित्रकार मुकुंदराव पाटील यांच्याशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. अस्पृश्यता निवारणाशिवाय देशोद्धार शक्य नाही असे त्यांचे ठाम मत होते.

इतर सत्यशोधकांप्रमाणे काळाच्या ओघात त्यांचे साहित्य नष्ट झाले. किंवा काही जाणीवपूर्वक धर्माभिमान्यांनी केले असेल हे नाकारता येत नाही. परंतु सत्यशोधकांनी आपल्या जीवाचे रान करुन केलेले कार्य अजोड आहे हे मात्रो कुणालाही नाकारता येत नाही.

यशवंतराव बापूंच्या प्रेरणेनेच बेलुऱ्यात सत्यशोधक व ब्राह्मेत्तर चळवळीत कार्य करणारे व्रतस्थ आनंदराव लढके गुरुजी व नलीनीताई लढके हे दामत्या घडले. नलीनीताई यवतमाळ येथे झालेल्या सत्यशोधक अधिवेशनाच्या अध्यक्ष होत्या. विद्यमान परिस्थितीत या गावाचे घेतलेली सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतीक झेप ही यशवंतराव बापूंच्या प्रेरणेचे फळ होय. (सदरहू लेखनास अरविंद उतखेडे आणि गोपाल रुपराव सिंघन यांची मदत झाली.)

**सतीश जामोदकर**
**अखंड, १२८ चंद्रावतीनगर, साईनगर जवळ, अमरावती**
**मो.९४२३३७४६७८**

# भारतीय विज्ञान कॉँग्रेस: विज्ञाननिष्ठांच्या मांदियाळीचा आठवडा

नागपूर शहर भारतातील संत्रा नगरी. देशाचे टायगर कॅपिटल. कधी काळी गोंड राजांच्या राजधानीचे शहर. विविध सामाजिक चळवळींचे शहर. प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रामटेक पासून तर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षा घेतलेल्या दीक्षाभूमीचे शहर. हे शहर जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जगभर गाजले ते विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कुंभमेळ्याने...

भारतीय विज्ञान कॉँग्रेसचे आयोजन ३ ते ७ जानेवारी या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या परिसरात करण्यात आले. नागपूर विद्यापीठाचे हे शतकमहोत्सवी वर्ष. या वर्षात राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांचे आयोजन या ठिकाणी झाल्यामुळे नागपूर विद्यापीठाच्या गौरवात भर पडली आहे. यापूर्वी १९७४ मध्ये भारतीय विज्ञान कॉँग्रेसचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे विद्यापीठाच्या शतकमहोत्सवी वर्षात हे आयोजन नागपुरातच व्हावे, यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आग्रही होते. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रदर्शनातून "होस्ट स्टेट'च्या माध्यमातून राज्याची विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगती जगापुढे आणली. या तीनही नेत्यांनी उद्घाटन सोहळ्याला उपस्थिती लावून महाराष्ट्रासारख्या विशाल प्रदेशात हा ज्ञान आणि विज्ञानाचा कुंभ होत असल्याचा आनंद व्यक्त केला. उद्घाटन कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे संबोधन प्रेरणादायी होते. शेती, मातीपासून अवकाशापर्यंत विज्ञान–तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगाचे नेतृत्व भारताला करायचे आहे त्यासाठी या महत्त्वपूर्ण आयोजनातून प्रेरणा मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

विज्ञान कॉँग्रेसमध्ये विविध विज्ञान आधारित कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्र, नोबेल पारितोषिक विजेत्या वैज्ञानिक प्रा. ॲडा योनाथ यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यात २७ परिसंवाद, बाल, महिला, शेतकरी व आदिवासी विज्ञान कॉँग्रेसचा समावेश होता. यंदा प्रथमच आदिवासी विज्ञान कॉँग्रेसचे आयोजन करण्यात आले होते. पाच दिवस चाललेल्या या विज्ञान परिषदेला एक लाखावर विज्ञानप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विज्ञानप्रेमींसाठी पर्वणी ठरणाऱ्या या परिषदेत सर्वच विषयांवर सखोल चर्चा झाली. अनेक दिग्गजांचा यात सहभाग होता. विविध विषयांवर परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. देश–विदेशातील अनेक संशोधक, वैज्ञानिक या परिषदेत सहभागी झाले होते. प्रश्न उत्तरे, जिज्ञासा, आविष्कार, संशोधन अशा उपक्रमाने पाच दिवस हा परिसर भारावला होता.

बाल विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन ङ्गनिरीफचे माजी संचालक डॉ. सतीश वाटे यांच्या हस्ते झाले. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सभामंडपात हे प्रदर्शन मांडण्यात आले. १० ते १७ वर्षे वयोगटातील बालवैज्ञानिकांचे विविध प्रयोग येथे प्रदर्शित करण्यात आले. देशभरातील सर्वच भागातून आलेल्या बालकांनी या प्रदर्शनाला उपस्थिती लावली. हे प्रदर्शन बघून पुढील शतकात विज्ञान तंत्रज्ञानावर भारताचा प्रभाव असेल याचा विश्वास वाटत होता. किशोरांनी अतिशय अभ्यासपूर्ण प्रतिमानांचे सादरीकरण केले. मोठ्या संख्येने शाळकरी मुलांनी या विज्ञानप्रदर्शनाचा लाभ घेतला.

यावर्षीच्या भारतीय विज्ञान कॉँग्रेसचे ब्रीदवाक्य होते, "विज्ञान आणि तंत्रज्ञानासह महिलांचे सक्षमीकरण'. त्यामुळे या कॉँग्रेसवर महिलांचा पहिल्या दिवसापासूनच प्रभाव होता. हे देशव्यापी आयोजन श्रीमती विजयलक्ष्मी सक्सेना यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरीत्या पूर्ण झाले. विज्ञानाच्या सहाय्याने शाश्वत विकासाचे ध्येय प्राप्त करण्यात महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. महिलांनो आता स्वयंस्फूर्तीने विज्ञानक्षेत्रात भरारी घ्या आणि आकाश कवेत घ्या, असे आवाहन महिला कॉँग्रेसमध्ये करण्यात आले. बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. असंख्य अडचणींवर मात करीत केलेली वाटचाल राहीबाईंनी यावेळी कथन केली. या कॉँग्रेसचा समारोप रसायनशास्त्रांमध्ये नोबेल पुरस्कार विजेत्या प्रा.ॲडा योनाथ यांनी केला.

भारतीय विज्ञान कॉँग्रेसमध्ये प्रथमच आदिवासी विज्ञान कॉँग्रेसचे आयोजन करण्यात आले होते. सभागृहाचे नाव होते शहीद बिरसा मुंडा सभागृह. आदिवासींनी विकसित केलेल्या तंत्राचा उपयोग शेती आणि औषध निर्मिती क्षेत्रात व्हावा, असा आदिवासी विज्ञान कॉँग्रेसमधील सूर होता. आदिवासी बहुल भागामध्ये प्रथमच आदिवासी आणि विज्ञान यांची सांगड घातली जात होती. ही एक स्तुत्य सुरुवात ठरली.

देश धान्य उत्पादनात खुप पुढे गेला आहे. यामागे शेतकऱ्यांची फार मोठी मेहनत आहे. मात्र, अजूनही शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती फार सुधारली नसल्याचे दिसून येते. शेती व्यवसायाच्या प्रगतीसाठी आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांनी बाजारतंत्रही अवगत करणे आवश्यक असल्याचा शेतकरी विज्ञान कॉँग्रेस परिषदेतील सूर होता.

प्राईड इंडिया एक्सपो हे विशेष आकर्षण ठरले. या एक्सपो मध्ये अनेक विज्ञानविषयक स्टॉल लावण्यात आले. यास विज्ञानप्रेमींची गदी पहायला मिळाली. दररोज सायं. सहा ते आठ या वेळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

समारोपाला कानपुरवरुन नागपूर येथे दाखल झालेल्या विज्ञान ज्योतीला विज्ञान कॉँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. विजयलक्ष्मी सक्सेना यांनी डॉ. अरविंद सक्सेना यांना विज्ञानज्योत सोपवून अधिकृत समारोप जाहीर केला. खऱ्या अर्थाने विज्ञानाचा हा महाकुंभ विज्ञानप्रेमींसाठी एक मोठी पर्वणी ठरला. या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व त्यांच्या चमूने केलेल्या मेहनतीचे विजयलक्ष्मी सक्सेना यांनी समारोपीय सोहळ्यात कौतुक केले. नागपूरच्या शिरपेचातील महत्त्वपूर्ण बाब म्हणून या कार्यक्रमाची नोंद असेल.

**अतुल पांडे, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, नागपूर.**

# पणन महामंडळाची खासगीकरणाकडे वाटचाल

**सडक अर्जुनी:** सद्यस्थितीत देशात केंद्र शासनाने खाजगीकरणाला चालना देणारे कृषी विधेयक आणले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन सुद्धा तीच वाटचाल अवलंबित असल्याचे आरोप तालुक्यातील शेतकरी करीत आहेत.

गोंदिया जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी सुद्धा खाजगीकरणाला वाव देऊन सहकार्य करीत आहेत. सन २०२१-२२ च्या आधीच्या धान खरेदी करणाऱ्या संस्था पैकी ११ संस्थांना सन २०२२ च्या नोव्हेंबर महिन्यात धान खरेदीची मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये ४२ संस्था सन २०२१-२२ च्या रजिस्ट्रेशन व ऑडीट झालेल्या असून शासनाने आधारभूत धान खरेदी करिता नविन बनविलेल्या ८६ संस्थांचे ऑडिट न करता सुद्धा मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी गोंदिया यांनी धान खरेदी करण्यासाठी त्या संस्थांकडून लागणारे कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी २६ डिसेंबर २०२२ पर्यंत मुदत दिली होती. त्या नविन बनविलेल्या संस्थांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करून दिली. पण मागिल ऑडीट झालेल्या ४२ संस्थांना डावलून ८६ नविन बनविलेल्या संस्थांचे



लोकप्रतिनिधी संबंधित असल्याने हितचिंतक बनून संपूर्ण १२८ केंद्रांना मंजुरी देण्याचे नाव समोर करून त्या ४२ संस्थांवर कुराळघात करून नवीन संस्थांना मंजुरी मिळाली पाहिजे अशी रट लावून घेत आहेत.

एकिकडे ३१ जानेवारी २०२३ पर्यंत धान खरेदीची मर्यादा असून हा प्रकार समोर आणून राजकीय पुढारी आपल्या कार्यकर्त्यांची पोळी भाजण्याचा प्रकार असल्याचे चिन्ह दिसत आहे. मागिल १५ दिवसांआधी जिल्हा पणन अधिकारी वाजपेयी यांची बदली करण्यात आली. लोकप्रतिधींच्या दबावाखाली नविन संस्थांना मंजूरी देऊनच जातील अशी नव्याने बनविलेल्या संस्थांचे संस्थाचालक खाजगीत बोलत आहेत.

वास्तविक नव्याने बनविलेल्या ८६ संस्थांची ईडी मार्फत चौकशी करून सदर प्रकार उघडकीस आणावा, अशी शेतकऱ्यांमध्ये ओरड सुरू आहे. तसेच गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी लक्ष देऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मागणी आहे.

# सरकारने शेतकऱ्यांना न्याय द्यावा:गंगाधर परशुरामकर

**सडक अर्जुनी:-** धान हमी भाव केंद्रावर विक्री करताना शेतकरी बांधवांचा नुकसान होवू नये फसवणूक होवू नये म्हणून शासन नवनवीन उपक्रम अमलात आणते. या तांत्रिक युगात सर्व नियम हे संगणकीय प्रणालीच्या माध्यमातुन अमलात आणली जातात व यातच शेतकरी बांधवांचा जीव जातो असाच प्रकार यावर्षी ई-पीक पाहणीत घडला आणि ई-पीक पाहणी नोंदणी पासून जिल्ह्यात हजारो शेतकरी वंचित राहिले तर काही शेतकरी बांधवानी ई-पीक पाहणी शेतात जावून केली पन त्याची सात बारा वर नोंदणी झाली नाही. त्यामुळे धान विकण्यास अडचण निर्माण झाली आहे असे असतानाही जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात १०३ टक्के नोंदणी झाली असल्याचे समजते त्यामुळे यात शेतकरी चुकला की तलाठी चुकला की संगणकात घोळ झाला याचा किस न काढता शेतकऱ्यांचे धान खरेदी केंद्रावर विक्री होवून त्यांना न्याय मिळावा अशी मागणी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष गंगाधर



परशुरामकर यांनी केली आहे.

ई-पीक पाहणी करून शेतकऱ्यांनी शेतातून संगणकीय प्रणालीत लोड करायचे सुचना आहेत. त्यानुरूप शेतकऱ्यांनी शेतात जावून हा प्रयोग केला मात्र अपलोड झाले नाही. परिणामी शेतकऱ्यांना नवीन सातबारा मिळत नसल्याने धान विक्रीची अडचण निर्माण झाली. ही स्थिती एकट्या जिल्ह्याची नसून सर्वच जिल्ह्यातही परिस्थिती असल्याने यातील त्रुट्या दूर करण्याची मागणी समोर आली. त्या अनुषंगाने या प्रकरणात सखोल चौकशी केली असता अनेक ठिकाणी संगणकीय चुकीमुळे जंगल गावातील शाळा याची सुद्धा नोंद झाली आहे आणि यामुळेच जिल्हाधिकारी कार्यालयात १०३ टक्के नोंदणी झाली. शासना कडून नवीन नोंदणी सुरू केली तर शेतात धान नाही म्हणून ई-पीक नोंदणी होऊच शकत नाही म्हणून खरे अडचणीत असलेले शेतकरी यांची सखोल चौकशी करून हस्तलिखित सात बारा त्यावर पीक क्षेत्र नोंद करून देण्यात यावा हाच एक पर्याय आहे तसेच हे सर्व जिल्ह्यात घडले आहे.

एकट्या डव्वा येथे २६५ शेतकरी, चिखली येथे सुमारे ५०, पिंडकेपार येथे ३५ असे हजारो शेतकरी बांधवाना अडचण निर्माण झाली आहे. मात्र हे एवढ्यावर थांबले नाहीत तर ज्या शेतकऱ्यांनी शेतात जावून ई-पीक पाहणी केली त्यांचाही सातबारा वर पीक नोंदणी झालीच नाही. म्हणून या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी तातडीने लक्ष घालून शेतकरी बांधवाना न्याय द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे.

## पोलिस स्थापना दिनानिमित्त चिचगड पोलिसांतर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन

**देवरी:** पोलिस स्थापना दिन सप्ताहाचे जिल्ह्यात आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त चिचगड पोलिसांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्थानिक श्रीराम विद्यालय चिचगड येथे ७ जानेवारी रोजी कार्यक्रम घेवून पोलिस कामकाजाची माहिती दिली. त्याचप्रमाणे पोलीस दल व त्याचे कामकाज तसेच पोलीस व जनता यांचे संबंध कसे असावे, यावर ठाणेदार शरद पाटील यांनी मार्गदर्शन केले.

पोलीस स्थापना दिवस सप्ताहाच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलिस अधिक्षक अशोक बनकर,



उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, सुनील ताजने यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलिस दलातर्फे जिल्हाभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. या अनुसंगाने श्रीराम विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करून चिचगड पोलिसांनी विद्यार्थ्यांसोबत पोलिस स्थापना दिन साजरा केला.

यावेळी 'पोलीस स्थापना दिवस सप्ताह' निमित्ताने जनमानसात पोलीस विभागाच्या प्रति सहानभूती निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना ठाण्यातील विविध कामकाजाची माहिती देण्यात आली. हत्यार तसेच दारूगोळा यांची प्राथमिक माहिती, विविध कालमानुसार दाखल होणाऱ्या गुन्ह्याची माहिती, पोलीस स्टेशन व कोर्ट यांचे कामकाज कसे चालते याबद्दल सविस्तर माहिती, वाहतुकीचे नियमा बाबत माहिती, अंधर्शद्धा निर्मूलन, बाल लैगिक अत्याचार, ऑनलाईन फसवणूक, भ्रष्टाचार, सायबर काईम बाबत माहिती, महिला व बालकांची सुरक्षितता संबंधात माहिती, रस्ते अपघात व नियम जागरूकता, नक्सल विरोधी जागरूकता आदि वरील सर्व मुद्यांची माहिती शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्याथी, व शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

## चिचगड उपसरपंचपदी व्दारकाप्रसाद धरमगुडे

**चिचगड:-** चिचगड ग्रामपंचायत मध्ये. दिनांक नऊ तारखेलाझालेल्या निवडणुकीत द्वारकाप्रसाद (घसरण )धरमगुडे यांची निवड उपसरपंच म्हणून मतदानाने निवड करण्यात आली. ग्रामपंचायत मध्ये एकूण नऊ सदस्य आणि जनतेतून थेट निवडून आलेली भाग्यश्री भोयर ही सरपंच म्हणून आधीच निवडून आलेली होती.

त्यात आज झालेल्या उपसरपंचाच्या निवडीत दोन सदस्यांनी फॉर्म भरला होता. यात द्वारकाप्रसाद धरम गुडेला ७ मते आणि विकी जन बंधूला ३ मते मिळाली. यात द्वारकाप्रसाद धर्मगुडे यांच्या विजय झाला.

## सरपंचांनी सर्वांगिण विकासाचे ध्येय बाळगावे !-आमदार मनोहर चंद्रिकापुरे

**सडक अर्जुनी:** - गावांचा विकास झाला तरच देशाचा सुध्दा सर्वांगिण विकास होवू शकतो. त्यामुळे नवनियुक्त सरपंचानी गावाचा विकास आराखडा तयार करुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. सरपंचांनी



गावाच्या सर्वांगिण विकासाचा ध्येय उराशी बाळगून कार्य करावे असे आवाहन आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी केले.ते स्थानिक तेजस्विनी लॉनमध्ये तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित तालुक्यातील नवनिर्वाचित सरपंच व सदस्य यांच्या सत्कार सोहळ्यात बोलत होते.

प्रमुख अतिथी म्हणून राकाँ जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकार, जिप उपाध्यक्ष यशवंत गणवीर, जिप सदस्या सुधा रहांगडाले, जिल्हा बँकेचे संचालक गजानन परशुरामकर,नगराध्यक्ष तेजराम मडावी, उपाध्यक्ष वंदना डोंगरवार, पंस सभापती कामिनी कोवे, पंस सदस्य डॉ. रुकीराम वाढई, शिवाजी, माजी जिप सदस्य रमेश चुन्हे, शशिकला टेंभुर्ने, आनंद अग्रवाल, दीक्षा भगत,शाहिस्ता शेखशे आदी उपस्थित होते. या वेळी तालुक्यातील नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा आ. मनोहर चंद्रिकापुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**दवडीपार ग्रामपंचायत सरपंचपदी बुगलाल कटरे व उपसरपंच पदी साहेबलाल बिसेन यांची निवड**



**तिरखेडी ग्रामपंचायत सरपंचपदी सौ.प्रिया मनोज शरणागत व उपसरपंच पदी सदाशिव कोठेवार यांची निवड**



**सेजगाव ग्रामपंचायत सरपंचपदी सौ.उषा कठाने तर उपसरपंच पदी टेकचंद बिसेन यांची निवड**



# रुग्णालय परिसरात घाणयुक्त पाणी



**देवरी:** नगरपनचायतीच्या सार्वजनिक शौचालयातील घाणयुक्त पाणी रानी दुर्गावती चौकातील ग्रामीण रुग्णालय परिसरात जात आहे. त्यामुळे रुग्णालय परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. परिणामी, येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मात्र नगरपंचायतीच्यावतीने याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

शहरासह गावात घाण पसरु नये, याकरिता सर्वत्र स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत आहे. याकरिता शासनाकडून कोट्यावधी रुपये खर्च करण्यात येत आहे. मात्र, देवरी नगरपंचायत प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे येथील सार्वजनिक शौचालयांची दुरवस्था झाली आहे. शहरातील रानी दुर्गावती चौकात ग्रामीण रुग्णालय आहे. रुग्णालयात अनेक नागरिक उपचाराकरिता येतात. रुग्णालयाला लागून नगरपंचायतीचे सार्वजनिक शौचालय आहे. येथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. मात्र, नगरपंचायत, रुग्णालय प्रशासन व लोकप्रतिनिधींचे याकडे दुर्लक्ष दिसून येत आहे. परिणामी दुर्गंधी पसरली असून येथे ये-जा करणाऱ्या व परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

**सर्वच शौचालयांची दुरवस्था**

देवरी नगरपंचायतीच्यावतीने शहरातील अनेक ठिकाणी सार्वजनिक शौचालयांची निर्मिती करण्यात आली. मात्र नगरपंचायत प्रशासनाकडून शौचालयांची योग्यरित्या साफसफाई करण्यात येत नसल्यामुळे सर्वच शौचालयांची दुरावस्था झाली आहे.

## जिप नियोजन समिती सदस्यपदी जयश्री देशमुख

**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील महागांव क्षेत्राच्या जिप सदस्या जयश्री अनिल देशमुख यांची गोंदिया जिल्हा परिषद नियोजन समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



जिप अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नियोजन समिती सदस्य शितल पुंड यांनी २८ डिसेंबर २०२२ च्या पत्रान्वये जिल्हा परिषद सदस्या जयश्री देशमुख यांची गोंदिया जिल्हा परिषद नियोजन समितीच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे.

## शौर्य पवार हिची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीकरिता निवड

**अर्जुनी मोरगाव:-** तालुका विज्ञान मंडळ पंचायत समिती अर्जुनी मोरच्या वतीने दिनांक ५ व ६ जानेवारी २०२३ रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये जी. एम. बी. हायस्कूल अर्जुनी मोरची इयत्ता नववीतील विद्यार्थिनी कुमारी शौर्य ओमप्रकाशसिंह पवार हिने माध्यमिक गटातून विज्ञान प्रदर्शनीमध्ये सहभाग नोंदवून तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. आयोजित विज्ञान प्रदर्शनी तंत्रज्ञान आणि खेळणी या मुख्य विषयासह हिस्टॉरिकल डेव्हलपमेंट विथ करंट या विषयावर आधारित प्रिझर्वेशन ऑफ डीएनए फोर फ्युचर बाय फ्रोजन आर्क हा प्रोजेक्ट प्रदर्शनीमध्ये प्रदर्शित केला. सद्यस्थितीत वातावरणीय बदल किंवा अन्य कारणांमुळे काही प्राणी अथवा वनस्पती लुप्तप्राय होत आहेत. अशा प्राण्यांचे डीएनए पेशी वा बियाणे भविष्याकरिता राखून ठेवण्याची प्रक्रिया याबाबत विश्लेषणात्मक माहिती देऊन तालुक्यातून प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. तिचे मार्गदर्शक शिक्षक शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक व पालक वृंद यांनी भरभरून कौतुक केले.



## विद्यार्थी देशाची उज्वल भविष्य-रविकांत बोपचे




**गोरेगाव:** शालेय जीवनात वार्षिक स्नेहसंमेलनाला विशेष महत्व आहे. स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभांसह कलागुणांना वाव मिळत आहे. त्यांच्या सुप्त गुणांसह मानसिक, बौद्धिक तथा शारीरिक विकास साधने साध्य होतो. आजचे विद्यार्थी हे देशाचे उज्वल भविष्य आहेत.

शिक्षणासोबतच कलागुणांना वाव देणाऱ्या संधी मिळाल्यास विद्यार्थी हे बौद्धिक, मानसिक व शारीरिकदृष्ट्या सुदृढ असतील तरच समाजाचा व देशाचा आधारस्तंभ होतील. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व संस्कार देऊन उत्तम नागरिक घडविणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रिडा व सांस्कृतीक कार्यक्रमांमध्ये सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन युवा नेते रविकांतबोपचे यांनी केले.

तालुक्यातील शहारवानी येथे स्व. ब्रिजलालजी कटरे हायस्कूलतर्फे वार्षिकोत्सव स्नेहसंमेलनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतीक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र कटरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी इयत्ता १० वीमध्ये ९० टक्क्याहून अधिक गुण मिळालेल्या गुणवंत विद्यार्थी दिप्ती येळे, स्वाती पटले, मोहिने ये७, साक्षी चव्हाण, रंजिता कावळे व अंकित पटले यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा परिषद सभापती संज़य टेंभरे, सरपंच सचिन मेश्राम, उपसरपंच तुकाराम गौतम, पोलीस पाटील तेजलाल पटले, सुरेश नेवारे, राजेश पटले, विनोद गौतम, हितेंद्र ठाकरे, बी.टी.चौधरी, डॉ. गणवीर, राजेश बिसेनसह पालक वर्ग,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# विद्यार्थी हे देशाचे उज्वल भविष्य: राजेंद्र जैन

**गोंदिया:** विद्यार्थी हे देशाचे उज्वल भविष्य आहेत. त्यामुळे शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना गुणांना वाव मिळायला पाहिजे, विद्यार्थी हे बौद्धिक, मानसिक व शारिरीक दृष्ट्या सुदृढ असतील तरच समाजाचा व देशाचा आधारस्तंभ होतील. ग्रामीण भागातील विद्यार्थी शैक्षणिक सुविधा, दळणवळणाची साधने इत्यादी वर मात करुन स्वप्नपूर्तीकडे वाटचाल करण्याची जिद्द बाळगून शिक्षण घेतात. ह्या विद्यार्थ्याना योग्य मार्गदर्शन व संस्कार देऊन उत्तम नागरिक घड.विने हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांना भविष्यात विविध क्षेत्रात उत्तम संधी आहेत. याकरीता विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रिडा व सांस्कृतीक कार्यक्रमांमध्ये सहभाग




घ्यावा, असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

स्व.रूपचंदजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, गोंदिया व्दारा संचालित राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय व एस.एस.टी. इंग्लिश स्कूल सतोनाच्या वतीने वार्षिकोत्सव स्नेह सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना राजेंद्र जैन बोलत होते.

स्नेह सम्मेलनाचे अध्यक्षस्थानी माजी आमदार राजेंद्र जैन होते. तर उदघाटक संस्था सचिव श्रीमती टी.एस.तुरकर यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन मोठ्या थाटात संपन्न झाले. या वर्षी 'उदय' या संकल्पनेवर आधारित आकर्षणचा केंद्रबिंदु ठरलेले सांस्कृतिक कार्यक्रम विद्यालयाच्या प्रांगणात सादर करण्यात आले. साक्षरता, समाज जागृती, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रीय जबाबदारी, ध्येय निश्चिती, निसगार्बाबतची कृतज्ञता यासारख्या विविध विषयावर विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सुंदर सादरीकरण केले.

वार्षिकोत्सव स्नेह सम्मेलनात प्रामुख्याने श्रीमती टी. एस. तुरकर, हनस ठाकरे, केतन तुरकर, नेहा तुरकर, रामलाल उइके, बलिराम उइके, गोवर्धन पटले, नूतनलाल तुरकर, एन.बी.बोपचे, जी.एन. चौहान, एस.एन.मानकर, गेडाम, सुनील पटले, रौनक ठाकूर यांच्यासह पालक वर्ग, शिक्षकवृंद, शालेय कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.



# प्रवासी रेल्वे गाड्यांना विलंब कशामुळे?

## बिलासपूर झोनचे अधिकारी दाखल: लेटलतिफपणा दूर होणार का? प्रवाशांचे लक्ष

**गोंदिया:** हावडा-मुंबई मार्गावरील रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक मागील तीन-चार महिन्यांपासून पूर्णपणे ढासळले आहे. सायंकाळी ७ वाजता येणारी गाडी सकाळी ७ वाजता येत आहे. प्रवासी रेल्वे गाड्यांना तब्बल सहा ते आठ तास विलंब होत आहे. त्यामुळे प्रवासीही संतपाले असून त्यांनी याविरोधात आंदोलन करुन रोष व्यक्त केला. यानंतर बिलासपूर झोनच्या महाव्यवस्थापक कार्यालयाच्या दोन अधिकाऱ्यांनी गोंदिया येथे पोहोचत प्रवासी गाड्यांना नेमका विलंब कशामुळे होत आहे. हे येथील रेल्वे स्थानक व्यवस्थापकांकडून जाणून घेतल्याची माहिती आहे.

मागील काही महिन्यांपासून हावडावरुन येणाऱ्या प्रवासी गाड्या डोंगरगडजवळ पाच ते सात थांबवून ठेवल्या जात आहेत. तर आठ-दहा मालगाड्या पास केल्या जात आहेत. परिणामी डोंगरगडपर्यंत वेळेत धावणाऱ्या रेल्वे गाड्या तिथे आल्यानंतर नागपूरकडे पाच ते सात तास उशिराने पोहोचत आहेत. परिणामी प्रवाशांना त्यांच्या नियोजित ठिकाणी पोहोचणे अडचणीचे होत आहे. अनेक प्रवाशांना नागपूर येथून पुढील गाडी पकडायची असते, पण गाड्या वेळेत पोहोचत नसल्याने त्यांची गाडी सुटत असल्याने त्यांना तिकिटाचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तर गोंदिया ते नागपूर हा प्रवास केवळ दोन तासांचा असताना मालगाड्यांना आधी प्राधान्य दिल्याने या गाड्यांना गोंदियावरुन नागपूरला पोहोचण्यासाठी तब्बल सहा ते आठ तास लागत आहेत.

या प्रकारामुळे संतापलेल्या प्रवाशांनी रेल्वे ट्रॅकवर झोपून आपला संताप व्यक्त केला होता.

### अडचण माहिती असूनही त्याकडे दुर्लक्ष का?

**डोंगरगड ते नागपूर दरम्यान नेमक्या प्रवासी गाड्या का उशिराने धावत आहेत. ही बाब रेल्वे प्रशासनाला चांगली माहिती आहे. प्रवासी गाड्यांऐवजी मालगाड्या सोडल्या जात असल्यानेच गाड्यांना विलंब होतो ही बाबसुद्धा स्पष्ट आहे. मग हा पाहणीचा फार्स कशासाठी? असा सवाल प्रवाशांकडून केला जात आहे. त्यामुळे मंगळवारपासून तरी या मार्गावरील रेल्वे गाड्या वेळेत धावणार का असा सवाल प्रवाशांनी केला आहे.**

### सायंकाळची ७.४५ वाजताची छत्तीसगड एक्सप्रेस पोहोचली सकाळी

**रविवारी (दि.८) गोंदिया रेल्वे स्थानकावर सायंकाळी ७.४५ वाजता पोहोचणारी छत्तीसगड एक्सप्रेस ही सोमवारी सकाळी ७.३० वाजता पोहोचली. तर विदर्भ, महाराष्ट्र आणि इतर गाड्यांची परिस्थितीसुद्धा काही वेगळी नाही.**



त्यानंतर याची दखल खा. सुनील मेंढे यांनी घेत रेल्वे स्थानकाला भेट देत गाड्या वेळेत सोडण्याचे निर्देश स्थानक व्यवस्थापकांना दिले. पण यानंतरही रेल्वे गाड्यांचा लेटलतिफपणा दूर झालेला नाही. त्यामुळे बिलासपूर झोनच्या महाव्यवस्थापक कार्यालयाच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गोंदिया रेल्वे स्थानकाला भेट देऊन माहिती जाणून घेतली. हा अहवाल वरिष्ठांकडे सादर केला जाणार असल्याची माहिती आहे.

# गोंदिया-बल्लारशा रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण सुरू

## डबल लाईन होणार: प्रवाशांना होणार सोयीचे

**गोंदिया:** गोंदिया-नागभीड-चंद्रपूर या रेल्वे मार्गाचा डबल लाईनच्या कामाचे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे. अशी माहिती रेल्वेचे वरिष्ठ मंडल प्रबंधक मनिंदर उपल यांनी पदाधिकारी आणि पत्रकार यांच्याशी अनौपचारिक चर्चा करताना दिली. या मार्गावर रेल्वेची डबल लाईन झाली तर अनेक समस्या निकाली निघणार आहेत.

गोंदिया-बल्लारशाह हा जवळ-जवळ २५० किलोमीटर अंतराचा रेल्वे मार्ग आहे. सध्या या मार्गावर दिवसातून जाणाऱ्या चार आणि येणाऱ्या चार प्रवासी गाड्यांचे आवागमन सुरु आहे. अनेक एक्सप्रेस गाड्याही या मार्गावर सुरु आहेत. गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदिया या तीन जिल्ह्यांतील रेल्वेची अनेक स्थानके या मार्गावर असून रोज हजारो प्रवासी या मार्गाने प्रवास करतात. या मार्गाने केवळ प्रवासी गाड्याच नाही तर भोपाळ, इंदोर,भिलाई, शालीमार, सिकंदराबाद येथून मोठ्या प्रमाणावर मालगाड्या जात व येत आहेत. गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्गावर दिवसभरात २५ ते ३० मालगाड्या धावत असल्याने या मार्गावरील प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्या चांगल्याच प्रभावित झाल्या आहेत.




**मालगाड्यांमुळे प्रवासी गाड्यांचा खोळंबा**

मालगाड्यांमुळे प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्या दोन ते तीन तास उशिरा धावत आहेत. एखादी मालगाडी एक-दीड तासांनी सुटणार असेल तर एक्सप्रेस गाडी व पॅसेंजर गाडीला आहे त्याचठिकाणी थांबविले जाते आणि प्रवाशांना ताटकळत राहावे लागते. असे प्रकार टाळण्यासाठी रेल्वेने या मार्गावर डबल लाईन टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने सर्वेक्षण सुरु करण्यात आले असल्याची माहिती वरिष्ठ रेल्वे प्रबंधक मनिंदर उपल यांनी दिली.

# जि.प.पं.स.कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या विशेष आमसभेत व्याजदर कमी करण्यासोबतच नोकरभरतीचा ठराव पारीत



गोंदिया,दि.१०:- जिल्हा परीषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या.गोंदिया र.न.१०२ च्या विशेष आमसभेमध्ये सभासद हिताचे क्रांतिकारी निर्णय सर्वसम्मतीने पारीत करण्यात आले.या विशेष सभेत ११ टक्के व्याजदर कमी करुन ८.७५ टक्के करण्याचा निर्णय घेत जाहीरनाम्यातील गोष्टी पुर्ण करण्याचा प्रयत्न नवनिर्वाचित संचालक मंडळाने पुर्ण केला.सभासदांच्या कल्याणकारी निर्णयासाठी आम्ही पारदर्शक काम करणार असल्याची ग्वाही आमसभेत संस्थेचे कार्यकारी प्रमुख सचिव कमलेश बिसेन यांनी दिली.

सभेला संस्थेचे अध्यक्ष मनोज माधो गोंडाने,उपाध्यक्ष आनंदकुमार रामाजी चर्जे,सचिव कमलेश वजीर बिसेन तसेच सर्वश्री संचालक हंसराज प्रेमदास धपाडे,रितेशकुमार किशन शहारे,अजयकुमार विश्वनाथ रामटेके,मनोज वासुदेव भुरे,विरेंद्र नत्थुजी कुंभरे,दिलीप लक्ष्मण शेंडे,ओमेश्वर गिरधारी बिसेन,कुवरलाल मोहनराव रहांगडाले,चंद्रशेखर शिवराम चौधरी,सचिन वसंतराव कुथे,सुनिल खिरसिंग राठोड,नामदेव मुकेश मेश्राम,रविकुमार त्र्यंबक पटले,चंद्रकांत सहसराम धपाडे व संचालिका रेखा रत्नाकरराव पारधी,प्रेमलता राजेश बागडे, संगिता गोर्वधन बिसेन,दिपीका मोहन यादव उपस्थित होते. गोंदिया जिल्हा परीषद व पंचायत समिती

कर्मचारी सहकारी पत संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार(दि.०८)मयुर लॉन कटंगी (कला) गोंदिया येथे आयोजित करण्यात आली होती. सभा संस्थेचे अध्यक्ष मनोज गोंडाणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.सभेचे संपूर्ण सूत्र संचालन संस्थेचे कार्यकारी प्रमुख सचिव कमलेश बिसेन यांनी केले. सभेला मोठ्या प्रमाणात सभासद उपस्थित राहून सर्वांनी आमसभेमध्ये सक्रिय सहभाग घेवून चर्चेअंती निर्णय सर्वसम्मतीने पारीत करण्यात आले.

यामध्ये सचिवांनी सदर सभेत कर्जावरील व्याजदर ८.७५ करण्याचे प्रस्तावित केले.या प्रस्तावाला आनंदी व उत्साह पूर्ण वातावरणात मंजूर करण्यात आले.उपस्थित सभासदांना सांगितले की, व्यवस्थापक समितीच्या शिफारसीनुसार सभासद कर्जावर ८.७५%,सभासद ठेवीवर ६%, आवर्त ठेवीवर एक वर्षाकरीता ६%, तिन वर्षाकरीता ६.५०% व पाच वर्षाकरीता ७% तसेच मुदती ठेवीवरील सुध्दा एक वर्षाकरीता ६%, तिन वर्षाकरीता ६.५०% व पाच वर्षाकरीता ७% नुसार अनुक्रमे व्याज दर कमी करण्याचे ठरविले आहे.उपस्थित सभासदांनी व्यवस्थापक समितीच्या या धाडसी निर्णयाबद्दल अभिनंदन करुन व्यवस्थापक समितीने जे अनुक्रमे व्याज ठरवुन दिले त्यावर सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

नोकर भर्तीची गरज नसतांना करून केवळ व्यक्तिगत हित साधण्याकरीता संस्थेवर बोजा वाढविण्यात येतो.वास्तविक डिजिटल युग असताना मनुष्यबळाची कमी आवश्यकता असल्याने नाहक शाखा उघडून पदे निर्माण केली जातात जे मुळीच योग्य नाही.याकरीता याकरिता व्यवस्थापक समितीच्या शिफारसीनुसार संस्थेमध्ये नोकर भरतीच्या नविन आकृतीबंदावर कायम स्वरुपी बंदी आणुन नविन पदे आमसभेच्या पुर्वमान्यतेशिवाय न भरणेबाबद उपविधी क्रमांक.फ .१.९ व्यवस्थापक समितीची कामे व जबाबदाऱ्या मधील ३ दुरुस्ती करण्याकरिता सचिवांनी सभेमध्ये ठेवले.त्यावर सभेमध्ये उपस्थित सर्व सभासदांनी चर्चेनंतर कायमस्वरूपी नोकर भती आकृतीबंधवर बंदी आणण्यात येवून १७ पदांचा आकृतीबंध अंतिम करुन पुढे पदे वाढविता येणार नाही असा ठराव मंजूर केला.

व्यवस्थापक समितीच्या शिफारसीनुसार कुटुंब कल्याण निधी योजना पुर्ववत सुरु व वेतनातुन २००/- रुपये प्रतिमाह मासीक कपात करणे,सभासद कर्जामधुन ५ टक्के अनिवार्य आणि सुरु केलेला एस.बी.आय. इन्सुरन्स बंद करणे संबंधी सभेत चर्चा करून सर्वानुमते मंजुर करण्यात आले.

मागील व्यवस्थापक समितीच्या गलथान व मनमानी कारभाराला कंटाळून तसेच काहींनी आर्थिक कारण समोर करून आपले सभासदत्व रद्द केले.अशा सभासदांना पुन्हा सभासद बनण्याची ईच्छा असल्यामुळे व्यवस्थापक समितीच्या शिफारशीनुसार एक वेळची बाब म्हणून संस्थे मधून १६/११/२०२२ पूर्वी स्वईच्छेने सभासदत्व रद्द केलेल्या माजी सभासदांना पुनश्च सभासदत्व प्राप्त करण्याकरिता संस्थेमधून सभासदत्व रद्द करतांनी परत घेऊन गेलेल्या सभासद ठेवी व शेअर्सच्या रकमेच्या ५% रक्कम संस्थेमध्ये भरून एकवेळची बाब म्हणून संस्थेमध्ये सभासदत्व देण्याकरीता उपविधी क. ड १.७ सभासदत्वचा राजीनामा दुरुस्ती करून त्यांना पुनश्च सभासदत्व प्राप्त करून देण्याकरिता सचिवांनी ठेवलेल्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. व्यवस्थापक समितीच्या शिफारसीनुसार सभासदांच्या पाल्याकरीता उच्चशिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज रु.५ लक्ष रु.२० लक्ष च्या मर्यादेत १ टक्के व्याज दर कमी करुन MBBS,BAMS, BDS,CA,CS , IIT,पायलट उच्च शिक्षण अभ्यासक्रमा करिता शैक्षणिक कर्ज उपलब्ध देणयासाठी यादीमध्ये समाविष्ट करण्यासह इतर ठरावांना सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.



# २९ लाख क्विंटल धान खरेदी, भरडाई मात्र ६० हजार क्विंटल

## ३३ हजार शेतकरी धान विक्रीच्या प्रतीक्षेत

**गोंदिया:-** जिल्ह्यात शासकीय धान खरेदी नेहमीच या-ना त्या कारणाने चर्चेत राहते.ते तब्बल दीड महिना उशिराने सुरूझालेल्या धान खरेदीने जिल्ह्यात चांगलाच वेग पकडला आहे. जिल्ह्यात पणन कार्यालय अंतर्गत आतापर्यंत सुमारे २९ लाख १८ हजार क्विंटल धान खरेदी झाली आहे.अडीच महिन्यात मात्र भरडाईसाठी केवळ ६० हजार क्विंटल धानाची उचल झाल्याची माहिती जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी दिली. विशेष म्हणजे धान खरेदीसोबतच भरडाईचा प्रश्न प्रशासन निकाली लावत नसल्याने खरेदी केलेल्या धानात घट होते.आणि त्या घटलेल्या धानाचा भुर्दंड संस्थांना सोसावा लागतो. मात्र शासन व प्रशासनातील अधिकारी संस्थाच्या या समस्येकडे लक्ष देण्याऐवजी भरडाईकरीता धान उचलणाऱ्या मिलर्सच्या समस्यांना प्राधान्य देत असल्याचे चित्रही दिसून येत आहे.जिल्ह्यात प्रामुख्याने खरीप तथा उन्हाळी हंगामात मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पन्न घेतले जाते. शासनाच्या हमीभाव किंमत योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडील धान जिल्हा पणन कार्यालय आणि आदिवासी विकास महामंडळाच्या उपअभिकर्तासंस्थांकडून खरेदी केले जाते.

यंदा ४५ लाख क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत पणन कार्यालयाने २९ लाख क्विंटल तर आदिवासी विकास महामंडळाने ९ लाख क्विंटल धान खरेदी केली आहे. पणन कार्यालय अंतर्गत सुमारे १ लाख १३ हजार ९४४ शेतकऱ्यांनी धान विक्रीसाठी नोंदणी केली. पैकी ८४ हजार १०८ शेतकऱ्यांनी ११४ केंद्रावर २९ लाख १८ हजार क्विंटल धान विक्री केले. ३८ हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांना धानाची रक्कम मिळाली असली तरी जवळपास तेवढ्याच शेतकऱ्यांना महिना लोटूनही धानाची रक्कम मिळाली नाही. परिणामी त्यांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागत आहे. धानाची उचल न झाल्याने बहुतांश गोदामे भरली आहे. धानाच्या भरडाईसाठी करारनामे करणे सुरू असल्याचे पणन कार्यालयाचे म्हणणे आहे. आतापर्यंत २८ मिलर्सनी सुमारे ६० हजार क्विंटल धानाची उचल केली आहे.

माहितीनुसार मिलर्स आणि खरेदी संस्थांच्या मागण्या प्रलंबित आहेत. यावर शासनाने तोडगा न काढल्याने अनेक मिलर्सनी धानाची



उचल न करण्याचा निर्णय घेतला आहे. वेळेवर धानाची उचल न झाल्यास उन्हाळी हंगामातील धान खरेदी (Paddy Sale) प्रभावी होऊ शकते.तसेच ६ ते ८ महिने धान गोदामांत पडून राहणार असल्याने नासाडी तर होणारच प्रचंड घटही येईल. ही घट संस्थांच्या माथी मारली जाते. परिणामी यात शासन व संस्थांचे नुकसान होते.

आपले जास्त नुकसान होऊ नये म्हणून संस्था पूवीच शेतकऱ्यांकडून एका क्विंटलवर १ किलोग्रॅम धान अधिकचे मोजले जाते ते सुध्दा शेतकऱ्यांच्या सहमतीनेच, हा सर्व प्रकार टाळण्यासाठी शासनाने धान खरेदी, वाहतूक, भरडाई संदर्भात विशेष धोरण आखणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतकरी, संस्था आणि शासनाचे नुकसान होणार नाही. तसेच मिलर्स यांच्याही मागण्यांचा विचार होणे आवश्यक आहे. परंतु खरेदीसोबतच भरडाईचेही आदेश दिल्यास खरेदी केलेल्या धानात घट येण्याचा प्रश्न जो निर्माण होतो, तो होणार नाही व संस्थांना नुकसान होणार नाही असे धान खरेदी केंद्रसंचालकांचे म्हणने आहे.

यंदाच्या खरीप हंगामातील धान खरेदीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत आहे. नोंदणी पैकी सुमारे ३० हजार शेतकऱ्यांनी धान विक्री केली नाही. पूर्वी ३१ मार्चपर्यंत धान खरेदी व्हायची या मुदतीतही धान खरेदी होत नसल्यामुळे एप्रिलपर्यंत शासनाकडून खरेदीला मुदत वाढ मिळायची शासनाने धान खरेदीला मुदत वाढ द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत पणन कार्यालयाच्या उपअभिकर्तासंस्थांमार्फत आतापर्यंत २९ लाख क्विंटल धान खरेदी झाली आहे. ३१ जानेवारी धान विक्रीची मुदत असली तरी शासनाकडून मुदतवाढ मिळेल. २८ मिलर्सनी ६० हजार क्विंटल धानाची भरडाईसाठी उचल केली आहे. इतर मिलर्स कडून करार करणे सुरूअसल्याचे जिल्हा पणन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी सांगितले.

# इंजि.दादा संग्रामे विशेष जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**अर्जुनी-मोरगाव** : "ग्राम हा विश्वाचा नकाशा' ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील विचाराने प्रेरित होऊन, वैराग्यमूर्ती गाडगेबाबांच्या स्वच्छतेचा मूलमंत्र स्वीकारुन तालुक्यातील सिरेगावबांध ग्रामपंचायतचा सर्वांगीण विकास साधणारे तत्कालीन सरपंच, विद्यमान उपसरपंच, ओबीसी संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष, इंजि. दादा (हेमकृष्ण) संग्रामे यांनाराज्यस्तरीय वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलनात विशेष जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



सिरेगावबांध ग्रामपंचायतचे सरपंच पद इंजि. दादा संग्रामे यांनी पाच वर्ष भूषविले. या कालावधीत त्यांनी शासनाच्या तालुका, जिल्हा, राज्य व केंद्र सरकारच्या योजना परिपूर्ण राबविल्यात. पक्षभेद बाजूला ठेवून, सर्वांना एकत्र करून, ग्रामस्थांच्या सहकार्याने शासनाचे अनेक पुरस्कार मिळविले. उच्च शिक्षण, प्रेमळ स्वभाव, ग्रामोन्नतीचा ध्यास यामुळे सिरेगावबांधला स्मार्ट व्हिलेज केले.

दादा संग्रामे यांच्या ग्राम विकासाची दखल घेऊन ६ व्या राज्यस्तरीय वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलनात विशेष जीवन गौरव पुरस्काराने आचार्य हरिभाऊ वेरुळकर यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी खा. सुनील मेंढे, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, जनार्दन लोथे गुरुजी, डॉ. प्रशांत ठाकरे महाराज, डॉ. संकेत काळे, लक्ष्मणदास काळे महाराज, ॲड. वसंत एंचीलवार, सुबोध दादा, सुखदास गाडेकर महाराज, राहुल निर्वाण, देवराव भांडारकर, लोकपाल गहाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पी.डी.राहांगडाले विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी उत्साहात



**गोरेगाव** :- स्थानिक पी.डी. राहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथे दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे थाटात उदघाटन पार पडले. उद्घाटनिय सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकजभाऊ राहांगडाले हे होते.

तर उदघाटक म्हणून पंचायत समितीचे सभापती मनोज बोपचे उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती उपसभापती राजकुमार यादव, जिल्हा परिषद सदस्य डॉ. लक्ष्मण भगत, माजी सभापती चित्रलेखाताई चौधरी, पंचायत समिती सदस्य रामेश्वर महारवाडे, शितलताई बिसेन, सुप्रियाताई गणवीर, माजी जि.प. सदस्य विश्वजीत डोंगरे, गटशिक्षणाधिकारी एन.जे. सिरसाटे, ग्रामहिता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.टी.पी.येळे, संचालक यु.टी. बिसेन, माजी प्राचार्य पी.एफ.बघेले, प्राचार्य वाय.आर. चौधरी, सी.डी.मोरघडे, बालवैज्ञानिक, मार्गदर्शक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. संचालन ए.एच. कटरे यांनी तर आभार प्रदर्शन बी.बी. बहेकार विषयतज्ञ यांनी केले.

बक्षिष वितरण सोहळ्याला जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे बक्षिष वितरक म्हणून उपस्थित होते.यावेळी पाहुणे म्हणून गोरेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.तालुकास्तरीय विज्ञानप्रदर्शनात



विज्ञान प्रदर्शनीचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी एन.जे. सिरसाटे यांनी केले. विज्ञान प्रदर्शनात ५८ प्रदर्शनीय मॉडेल ठेवण्यात आले होते. प्रथम,व्दितीय आलेल्या शिक्षक,विद्यार्थी व प्रयोगशाळा तंज्ञ यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

# कार्यकर्त्यांनो बुथ समर्थ करण्याचा संकल्प घ्या : केशवराव मानकर

**गोंदिया** : नुकत्याच झालेल्या गुजरातच्या निवडणुकीत भाजपने भरघोष यश मिळविले. हे सर्व बुथ मजबूत असल्याने व ५१ टक्के मते घेतल्याचे परिणाम आहे. जिल्ह्यातही जिल्हा परिषद, पंचायत समिती व आता झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये भाजपने मोठा विजय प्राप्त केला आहे. या विजयाचे शिलेदार असलेल्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन आहे. भविष्यातील निवडणुकीत विजयासाठी प्रत्येक बुथवर पेजप्रमुख तयार करा व बुथ सशक्त व समर्थ करुन ५१ टक्के मते मिळविण्याचा संकल्प घेण्याचे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांनी केले.




ते अर्जुनी मोर येथील साईश्रद्धा लॉनमध्ये ८ जानेवारी रोजी आयोजित भाजपच्या जिल्हा विस्तारीत बैठकीत अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी प्रामुख्याने खा. सुनिल मेंढे, आ. विजय रहांगडाले, जिप अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजीमंत्री राजकुमार बडोले, प्रदेश उपाध्यक्ष माजी आ. हेमंत पटले, प्रदेश सचिव माजी आ. संजय पुराम, माजी आ.खोमेश रहांगडाले, माजी आ. रमेश कुथे, माजी जि.प. अध्यक्ष विजय शिवणकर, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, भंडारा-गोंदिया संपर्क प्रमुख विरेंद्र अंजनकर, जिप सभापती संजय टेंभरे, जिल्हा महामंत्री संघटन संजय कुळकर्णी, जिल्हा महामंत्री मदन पटले, सुभाष आकरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भावना कदम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ओम कटरे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष जे.डी.जगणीत, अनुसूचित जनजाती मोर्चा जिल्हाध्यक्ष हनुवत वट्टी, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष गजेंद्र फुंडे, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष दीपक कदम, सीता रहांगडाले, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख जयंत शुक्ला, शेषराव गिरीपुंजे, शिवनारायण पालीवाल, मनोज बोपचे, विजय कापगते आदी उपस्थित होते. पुढे बोलताना मानकर म्हणाले, पंतप्रधान मोदींनी सर्वसामान्यांसाठी २०० पेक्षा जास्त कल्याणकारी योजना काढल्या. या सर्व योजना तळागळातील लोकांपर्यंत पोहचवा. मन की बात व परीक्षा पे चर्चा हे कार्यक्रम प्रत्येक बुथवर आयोजित करावे असे ते म्हणाले. खा. सुनिल मेंढे म्हणाले, जी २० चे अध्यक्षपद भारत भुषवित असून ही देशासाठी गौरवाची बाब असून मोठी संधी आहे. "फ्रेंड्स ऑफ बीजेपी"च्या माध्यमातून आपल्या विचारांच्या लोकांना सोबत घ्यावे. पंतप्रधान मोदीजी व पक्षाचे कार्य जनसामान्यांपर्यंत पोचविण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी आ. विजय रहांगडाले म्हणाले, सभागृहात केलेल्या धानाला बोनसची मागणी पूर्ण झाली असून १५ हजार रुपये प्रति हेक्टर शेतकऱ्यांना मिळणार आहे. शेतकरी हिताच्या निर्णयाने व्यापाऱ्यांचे नुकसान झाले असून व्यापाऱ्यांना लाभ पोहचविणारे विरोधक आगपाखड करीत आहेत. बोनसची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जाणार आहे. शेतकरी हिताचे निर्णय घेणाऱ्या शासनाचे त्यांनी आभार मानले. पंकज रहांगडाले यांनी जिपच्या माध्यमातून गोदाम बांधकामाचे कार्य वेग धरत आहे तसेच या वर्षीपासून भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी खेळ व सांस्कृतिक महोत्सव सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हेमंत पटले यांनी प्रास्ताविकातुन नुकत्याच झालेल्या ३४८ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषणात्मक माहिती देत बुथ जिंकण्यासाठी मार्गदर्शन केले. राजकुमार बडोले यांनी एक भारत श्रेष्ठ भारत या विषयावर मार्गदर्शन करत आपल्या देशात प्रांत, भाषा, वेशभुषा, संस्कृति, परंपरेत विविधता आहे. लोह पुरुष वल्लभभाई पटेल यांनी विविध संस्थानिकांना एकत्र आणून एक भारत श्रेष्ठ भारत घडविला तसेच आपण सुद्धा या माध्यमातुन शाळा-महाविद्यालय व संस्थांच्या माध्यमातून एकतेचे सुत्र निर्माण करण्यास सांगीतले. विरेंद्र अंजणकर यांनी सोशल मिडीयावर मार्गदर्शन करताना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षाचे ध्येय, धोरण, कार्यक्रम, शासनाच्या योजना, निर्णयांचा सामाजिक माध्यमातुन प्रचार, प्रसार करावा तसेच विरोधकांना उत्तर द्यावे, असे सांगीतले. संजय टेंभरे यांनी पंचायत राज व ग्रामविकास कमिटीबद्दल मार्गदर्शन केले. जयंत शुक्ला यांनी जी २० बद्दल विस्तृत माहिती दिली. प्रसंगी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री दिवंगत हिराबेन, सदाशिव अंजनकर आणि पत्रकार रमणकुमार मेठी यांना श्रद्धांजली देण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद स्विकृत सदस्यपदी निवड झालेल्या रामदास कोहाडकर व हरिहर मानकर यांचे सत्कार करण्यात आले. याप्रसंगी सुभाष निनावे, मंजुषा तरोणे, बाबूल बनिक आदींनी पक्षात प्रवेश केला. त्यांचा पक्षातर्फे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा महामंत्री लायकराम भेंडारकर यांनी केले. आभार जिल्हा महामंत्री मदन पटले यांनी मानले.

# शिक्षक मतदारांना मतदानाच्या दिवशी विशेष नैमित्तीक रजा

**गोंदिया** : भारत निवडणूक आयोगाने २९ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर निवडणूकीचे मतदान ३० जानेवारी २०२३ (सोमवार) रोजी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत व मतमोजणी २ फेब्रुवारी २०२३ (गुरुवार) रोजी होणार आहे. या निवडणूकीसाठी मतदार असलेल्या शिक्षक मतदारांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता यासाठी मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्यात यावी असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

या निवडणूकीसाठी मतदार असलेल्या शिक्षक मतदारांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तीक रजा देणे आवश्यक आहे. यासंदर्भातील राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३ जून २०११ च्या शासन निर्णयानुसार या निवडणूकीच्या मतदारांना मतदानाच्या दिवसाची विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्यात यावी. सदरची रजा ही कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या नैमित्तीक रजेव्यतिरिक्त असणार आहे, असे आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.